बंगाली भाषा प्रवेश

मराठी माध्यमाच्या द्वारा

खंड १

संपादक–लेखक
श्री. सतीन्द्रनाथ गजानन सुखटणकर

महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृति मंडळ
१९७३

बंगाली भाषा प्रवेश

मराठी माध्यमाच्या द्वारा



खंड १

संपादक - लेखक

श्री. सतीन्द्रनाथ गजानन सुखठणकर

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ

१९७३

© १९७३, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ

पहिली आवृत्ती : जानेवारी १९७३
(पौष, १८९४)

प्रकाशक :

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ
सचिवालय, मुंबई-३२

मुद्रक :

केशव चौधरी
निदेशक,
आंतर भारती मुद्रणालय,
२६४, ए टू झेड इंडस्ट्रीयल इस्टेट,
फर्ग्युसन रोड, लोअर परेल, मुंबई-१३.

* * * * *

४२, ग. द. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई-३१

किंमत : १६ रुपये

—: नि वे द न :—

भारत हे बहुभाषी राष्ट्र आहे. भारताची राष्ट्रीय एकात्मता ही पश्चिमी देशातील 'एकराष्ट्र एकभाषा' अशा समीकरणाची नाही. येथे वैविध्यपूर्ण व साहित्यसंपन्न अशा १५ इतर भाषा आहेत. या भाषांची व साहित्याची वाढ मुख्यतः संस्कृत भाषेच्या व साहित्याच्या प्रभावाखाली झाली आहे. इंग्रजी राज्य झाल्यानंतरच्या काळात पश्चिमी संस्कृतीच्या, पश्चिमी ज्ञानाच्या व आधुनिक शिक्षणाच्या द्वारा विचार व भावना यांचे संवादित्व या भारतीय भाषांमध्ये निर्माण होऊ लागले आहे. स्वातंत्र्याच्या आंदोलनाने व राजकीय एकात्मतेमुळे या भाषांचे वैचारिक संबंध अधिक निकटचे बनले आहेत. परंतु या भाषांचा भाषिक सीमाप्रदेश सोडल्यास, अन्योन्यसंबंध फार थोडा आहे. परंपरागत धर्म आणि इंग्रजी भाषा यांच्या द्वारेच वैचारिक, भावनात्मक व सांस्कृतिक मूल्यांची देवघेव होत आहे. ही देवघेव मोठ्या प्रमाणात होणे आपल्या सांस्कृतिक प्रगतीचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेच. परंतु, त्याहीपेक्षा भारताची राष्ट्रीय एकात्मता दृढ व अभेद्य बनविण्याकरिता अधिक आवश्यक आहे. याकरिता, महत्त्वाचा उपाय म्हणजे प्रादेशिक मातृभाषा बोलणाऱ्या लोकसमूहांमध्ये लगतच्या किंवा दूरच्या भारतीय प्रदेशांच्या भाषा उत्तम रीतीने अवगत केलेले, त्यांपैकी एक किंवा अनेक भाषा उत्कृष्ट रीतीने लिहू किंवा बोलू शकणारे आणि त्याचप्रमाणे त्या त्या अन्य प्रादेशिक भाषेतील प्रथितयश लेखांचे, ग्रंथांचे व ग्रंथकारांचे साहित्य स्वतःच्या प्रादेशिक मातृभाषेत चांगल्या रीतीने भाषांतरित व रुपांतरित करण्यास समर्थ असलेले सुशिक्षित निर्माण होण्याची मोठी निकड आहे.

ही निकड भागविण्याची पहिली पायरी म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाने आपली "आंतरभारती" ची योजना आखली आहे. या योजनेप्रमाणे सुशिक्षित मराठी मनुष्यास गुजराथी, उर्दू, बंगाली, कानडी इत्यादी इंडोआर्यन व द्राविडी भाषा स्वतंत्रपणे शिकता याव्या म्हणून प्रत्येक भाषेचे द्विभाषिक शब्दकोश (दोन्ही प्रकारचे म्हणजे गुजराथी-मराठी

मराठी - गुजराती असे) भाषा प्रवेश आणि साहित्य-परिचय अशी चार पुस्तके प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. या कार्यक्रमानुसार मंडळाच्या वतीने गुजराती - मराठी शब्दकोश', 'उर्दू - मराठी शब्दकोश', 'कानडी - मराठी शब्दकोश', 'गुजराती भाषाप्रवेश' 'कानडी साहित्य परिचय' हे ग्रंथ आधीच प्रकाशित झाले असून अन्य काही भाषांचे द्विभाषिक शब्दकोश, व साहित्य परिचय मुद्रणावस्थेत आहेत व काही संपादित होत आहेत.

मंडळाच्या आंतरभारती योजनेखाली "बंगाली भाषाप्रवेश" प्रकाशित करतांना मंडळास आनंद होत आहे. मंडळासाठी प्रस्तुत भाषाप्रवेश श्री. स. ग. सुखठणकर यांनी तयार केला आहे. सदर भाषाप्रवेश बंगाली भाषेचे अध्ययन करण्यास मराठी वाचकांस उपयुक्त होईल असा मंडळाचा विश्वास आहे. श्री. सुखठणकर यांनी मोठ्या आस्थेने व परिश्रमपूर्वक हे काम केले याबद्दल यांचे मंडळ आभारी आहे.

लक्ष्मणशास्त्री जोशी,

वाई, अध्यक्ष,

दि. ४ जानेवारी १९७३. महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ

अनुक्रमणिका

निवेदन

	प्रस्तावना	१
	विषय प्रवेश	१५

भाग पहिला

वर्णमाला

पाठ १ ला	अक्षर परिचय	१
पाठ २ रा	उच्चारण	१०
पाठ ३ रा	व्यंजनाक्षरांवर स्वरवर्ण जोडणे	४१
पाठ ४ था	जोडाक्षरे (फलायुक्त)	५७
पाठ ५ वा	दोन अक्षरी जोडाक्षरे	६८
पाठ ६ वा	तीन अक्षरी जोडाक्षरे	७८
	चार अक्षरी जोडाक्षरे	८२
पाठ ७ वा	इंग्रजी शब्द बंगाली लिपीत लिहिण्याची पध्दत	८६
	परिशिष्ट १ : विविध माहिती	९४
	परिशिष्ट २ : संख्यावाचक शब्द	१००
	परिशिष्ट ३ : महिन्यांच्या तारखा	१०४
	अभ्यासाची उत्तरे	१०५

भाग दुसरा

व्याकरण

पाठ १ ला	शब्दांच्या जाती	११५
पाठ २ रा	लिंग, वचन व पुरुष	१२८
पाठ ३ रा	कारक व विभक्ति	१४२
पाठ ४ था	शब्दरूपे (नामांची)	१५४
	शब्दरूपे (सर्वनामांची)	१६४
पाठ ५ वा	साधु भाषा व चलित भाषा	१७६
पाठ ६ वा	(१) काळ	१८०
	(२) सामान्य वर्तमान काळ	१८४

	(३) सामान्य भूतकाळ	१९६
	(४) रीतिभूतकाळ	२०४
	(५) भविष्यकाळ	२१०
पाठ ७ वा	असमापिका क्रिया	२१६
पाठ ८ वा	काळ (२)	२२४
	(१) अपूर्ण वर्तमान व पूर्ण वर्तमान	२२४
	(i) पूर्ण वर्तमान	२२७
	(२) अपूर्णभूत व पूर्ण भूत	२३४
	(i) पूर्ण भूत	२३७
	(३) अपूर्ण भविष्यकाळ व पूर्ण भविष्यकाळ	२४५
पाठ ९ वा	अर्थ विचार	२५०
	(१) आज्ञार्थ	२५२
	(२) भविष्यत् अनुज्ञा	२५५
पाठ १० वा	क्रियावाचक नामे; औचित्यार्थक, नकारार्थक व प्रश्नार्थक वाक्ये.	२६०
	(१) क्रियावाचक नामे	२६०
	(२) औचित्यार्थक वाक्ये	२६५
	(३) नकारार्थक वाक्ये	२६६
	(४) प्रश्नार्थक वाक्ये	२६७
पाठ ११ वा	(१) काळांचा वापर	२६९
	(२) असमापिका क्रियांचा वापर	२७४
	(३) आज्ञार्थ	२७६
पाठ १२ वा	निर्देशक व अनिर्देशक प्रत्यय, अनिश्चितार्थक व अनेकवचनार्थक शब्द	२७७
	(१) निर्देशक प्रत्यय	२७७
	(२) अनिर्देशक प्रत्यय	२८१
	(३) अनिश्चितार्थक शब्द	२८२
	(४) अनेकवचनार्थ शब्द	२८५

पाठ १३ वा	(i) विभक्ति-प्रत्ययांचा वापर	२८६
	(१) कर्ताकारक	२८६
	(२) कर्मकारक	२८७
	(३) करणकारक	२८७
	(४) संप्रदानकारक	२८८
	(५) अपादानकारक	२८८
	(६) अधिकरण कारक	२८९
	(ii) कारकाशिवाय विभक्तीचा वापर	२९०
	(१) प्रथमा	२९०
	(२) द्वितीया	२९१
	(३) पंचमी	२९२
	(४) षष्ठी	२९२
	(५) सप्तमी	२९४
पाठ १४ वा	विशेषणांचे तारतम्य	२९६
	(१) बंगाली पध्दत	२९६
	(२) संस्कृत पध्दत	२९८
पाठ १५ वा	धातूंचे प्रकार	३०२
	(१) प्रयोजक क्रियापद, प्रयोजक धातू व त्यांची रूपे	३०५
	(२) नामधातु	३१६
	(३) ध्वन्यनुकरणात्मक धातु	३२१
	(४) संयोग मूलक धातु	३२५
पाठ १६ वा	अव्ययाचा वापर	३३०
	(१) शब्दयोगी	३३०
	(२) उभयान्वयी अव्यये	३३२
	(३) केवल प्रयोगी अव्यये	३३५
	(४) अव्ययांचा अनेकार्थी वापर	३३८
पाठ १७ वा	नामे, विशेषणे व क्रियापदांचा विभिन्नार्थी वापर	३६०
पाठ १८ वा	इतर काळ व बंगालीतील विविध रचनांची वाक्ये	३९७
	(१) इतर काळ	३९७
	(२) बंगालीतील विविध रचनांची वाक्ये	४०३

पाठ १९ वा	प्रयोग, प्रत्यक्ष व परोक्ष कथन	४१३
	(१) प्रयोग, प्रयोग बदलणे	४१५
	(२) प्रत्यक्ष व परोक्ष कथन	४२१
पाठ २० वा	बंगाली वाक्यरचना	४२५
पाठ २१ वा	विरामचिन्हे	४३६
पाठ २२ वा	(१) संधि	४४१
	स्वरसंधि, व्यंजनसंधि, विसर्गसंधि	४४९
	(२) बंगाली संधि	४५२
	बंगाली स्वरसंधि, बंगाली व्यंजनसंधि	४५४
पाठ २३ वा	(१) 'न' चा 'ण' व 'स' चा 'ष' होण्याचे नियम	४५६
	(२) 'न' चा 'ण' होण्याचे नियम	४५९
पाठ २४ वा	समास	४६१
	(१) द्वन्द्व	४६२
	(२) तत्पुरूष	४६३
	(३) कर्मधारय	४७१
	(४) द्विगु	४७७
	(५) बहुव्रीही	४७८
	(६) अव्ययीभाव	४८५
पाठ २५ वा	शब्द प्रकरण	४८८
	(१) तत्सम, तद्भव, देशी, विदेशी	४८८
	(२) मौलिक वा स्वयंसिद्ध, साधित	४९४
	(३) यौगिक शब्द, रूढ वा रूढि शब्दयोगरूढ शब्द	४९५
	(४) प्रत्यय-विभक्ति, स्त्री प्रत्यय, कृत्, तद्धित	४९६
	(५) उपसर्ग	५२९
	(६) ध्वन्यात्मक शब्द	५३५
	(७) शब्दद्वैत	५४६

प्रस्तावना

चालू काळात निरनिराळ्या भाषांचे ज्ञान असणे किती आवश्यक आहे हे काही पटवून देण्याची आवश्यकता नाही. शालांत परीक्षेपर्यंत प्रत्येकजण मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्रजी ह्या चार भाषा शिकतोच. ह्याखेरीज केंद्रसरकारने मान्यता दिलेल्या इतर भाषांपैकी निदान एकतरी भाषा स्वतःस सुशिक्षित म्हणविणाऱ्या प्रत्येकाने शिकावी. इतर भाषा शिकणे ह्याचा अर्थ आपल्या मातृभाषेचा अभिमान आपण न बाळगणे असा नाही. आपल्या मातृभाषेचा अभिमान जरूर असावा परंतु इतर भाषांविषयीही उदासीन राहू नये. इतर भारतीय भाषा शिकताना आपल्याला विशेष अशा अडचणीही येण्याच कारण नाही. भारतांतील सर्व भाषांत संस्कृत शब्द विपुल प्रमाणात असल्यामुळे स्वतःकडे त्या भाषेचा नाही म्हटले तरी थोडाबहुत शब्द-संग्रह असतोच. केवळ उच्चारात व लिपीत फरक असल्यामुळे ही गोष्ट आपणास जाणवत नाही. त्यामुळे शिकावयाच्या दृष्टीने उरणाऱ्या मुख्य बाबी म्हणजे शब्दरूपे, निरनिराळ्या काळांतील क्रियापदांची रूपे व इतर थोडेसे व्याकरण ह्या बाबतीत जर योग्य मार्गदर्शक मिळाला तर केवळ त्या भाषेचे जुजबीच ज्ञान न होता अल्पावकाशात तीवर प्रभुत्व मिळविणेही सहज शक्य होते. इतर भाषांच्या अभ्यासाने आपल्या मातृभाषेची समृद्धि आपणांस साधता येते, तसेच निरनिराळ्या भाषिक घटकांतील एकतेची भावनापण वाढीस लागते. बंगाली ही एक संपन्न भाषा असल्यामुळे बंगालीचा अभ्यास ह्या दृष्टीने मराठी भाषिकांनी करणे अगत्याचे आहे.

निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांच्या संख्येच्या हिशेबाने पाहता बंगाली भाषेचा जगात सातवा क्रमांक लागतो. चिनी, इंग्रजी, रशियन, जर्मन जपानी व स्पॅनिश ह्या भाषांनंतर बंगालीचे स्थान आहे. भारतांत हिंदीचा प्रसार जरी खूप असला तरी ज्यांची मातृभाषा हिंदी आहे त्यांची संख्या, ज्यांची मातृभाषा बंगाली आहे त्यांच्यापेक्षा कमी आहे असा बंगाली लोकांचा दावा आहे. बंगाली भाषा ही आसाममधील मणीपुरचा थोडासा भाग, काछाड, श्रीहट्ट (सिल्हेट), पश्चिम गोयालपाडा, बांगला देश, पश्चिम बंगाल, छोटा

नागपुरमधील संथाळ परगणा, पुर्णिया मानभूम व सिंहभूम ह्या भागांत बोलली जाते. जवळजवळ तेरा कोटी लोकांची ही मातृभाषा आहे. बंगलिपीचा उपयोग तर बंगाली भाषेखेरीज, आसामी व मणीपुरी भाषांत पण (एखादे अक्षर वगळता) करतात. त्यामुळे बंगाली भाषेपेक्षाही तिच्या लिपीचे क्षेत्र अधिक विस्तृत आहे.

बंगाली भाषेतील वाङमय हे जगांतील श्रेष्ठ भाषांच्या तोडीस बसणारे आहे. अन्य भारतीय भाषांत तर तिने श्रेष्ठ स्थान पटकावले आहे. त्यामुळे बंगाली भाषेतील पुस्तकांची इतर भारतीय भाषांत (इंग्रजीतसुद्धा) जेवढी भाषांतरे झालेली आहेत, तेवढी इतर भारतीय भाषांतील पुस्तकांची झालेली नाहीत असे म्हटल्यास ते गैर ठरणार नाही. श्रीमद्भगवद्गीतेप्रमाणेच रवींद्रनाथ ठाकुरांच्या 'गीतांजली'चे पण सर्व प्रमुख जागतिक भाषांत भाषांतर झालेले आहे.

बंगाली भाषा ही सध्या इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, फ्रान्स, रशिया, जपान, आस्ट्रिया इत्यादि देशांच्या विद्यापीठांतून शिकविली जाते. हा मान संस्कृत-खेरीज इतर कोणत्याही भारतीय भाषेला मिळालेला नाही. संबंध आशिया खंडांत तर बंगाली भाषेलाच 'नोबेल' पारितोषिक मिळण्याचा मान मिळालेला आहे. ह्याविषयी अतुलप्रसाद सेन बंगाली भाषेला उद्देशून म्हणतात:—

"बाजिये रवि तोमार वीने
आनले माला जगत जिने।"

बाजिये रवि तोमार वीणे
आनले माला जगत जिने।

[अर्थ :- रवींद्रनाथांनी तुझी वीणा वाजवून (बंगालीत काव्य करून) जग जिंकून माळ (नोबेल पारितोषिक) आणली.]

केवळ साहित्यच नव्हे तर चित्रसृष्टि, नाट्य इत्यादि सर्वच क्षेत्रांत बंगाली लोक इतर भारतीयांपेक्षा पुढारलेले आहेत हे दरवर्षी त्यांना मिळणाऱ्या सरकारी पारितोषिकांवरून दिसून येते.

बंगभंग आंदोलनापासून महाराष्ट्र व बंगाल हे राजकीय दृष्ट्या एकत्र आले. त्यासुमारासच बंगाली साहित्याचा मराठीत अनुवाद व्हावयाला सुरवात

झाली. माधवानुज डॉ. काशीनाथ हरि मोडक (१८७२-१९१७) ह्यांनी मायकेल मधुसूदन दत्त ह्यांच्या 'मेघनाद वध' ह्या बंगाली काव्याचा अनुवाद केला. गोविंद केशव कानिटकर (१८५४-१९१८) ह्यांनी विश्वकवि* रवींद्रनाथ ठाकूर ह्यांच्या 'गीतांजली'चे रुपान्तर केले. दत्तात्रय माधव कुळकर्णी ह्यांनी रवींद्रनाथांच्या 'बउ ठाकुरानीर हाट' ह्या कादंबरीवर आधारलेली 'विभा' कादंबरी लिहिली. वासुदेव गोविंद आपटे ह्यांनी साहित्यसम्राट* बंकिमचंद्रांच्या सर्व कादंबऱ्यांची मराठी वाचकांस ओळख करून दिली. तीसपस्तीस वर्षांपूर्वी शं. वा. शास्त्री ह्यांनी कथाशिल्पी* शरत्चंद्राच्या काही दीर्घ कथांचा अनुवाद प्रसिद्ध केला. वि. सी. गुर्जर, पु. वा. कुळकर्णी ह्यांनी शरद्बाबूंच्या काही कथा कादंबऱ्यांचे मराठी अनुवाद केले. आणि मामा वरेरकरांसारख्या ज्येष्ठ साहित्यिकाने तर जवळजवळ संपूर्ण शरद्बाबूच मराठी वाचकांना उपलब्ध करून दिला आहे. शरद्बाबूंच्या व बंकिमचंद्रांच्या साहित्याच्या मानाने रवींद्रनाथांच्या साहित्याचा मराठीत अजून फारसा अनुवाद झालेला नाही. मराठीतील लो. टिळकांचे 'गीतारहस्य', पूज्य साने गुरुजींचे 'श्यामची आई' व पूज्य विनोबाजी ह्यांच्या पुस्तकांचे बंगालीत अनुवाद झालेले आहेत. रवींद्रनाथांनी मराठ्यांच्या इतिहासावर बंगालीत पुष्कळ कविता केल्या आहेत. संत तुकारामाच्या काही अभंगांचा पण त्यांनी बंगालीत अनुवाद केला आहे. (त्यांपैकी एका अभंगाचा अनुवाद परिशिष्टात देण्यात आला आहे.) महाराष्ट्राच्या दृष्टीने अभिमानाची बाब म्हणजे कै. सखाराम गणेश देऊस्कर (१८६९-१९१२) ह्यांनी केलेली बंगभाषेची सेवा ही होय. [ह्यांचा जन्म वैद्यनाथला झाला व कायम वास्तव्य बंगालमध्येच होते. लहानपणापासूनच त्यांना बंगाली साहित्याची आवड होती.] बंगभंग आंदोलनाच्या सुमारासच इ. स. १९०५ मध्ये 'हितवादी' ह्या बंगाली पत्रिकेचे ते संपादक झाले. त्यांनी बंगालीत पुढील पुस्तके लिहिली आहेत :- (१) देशेर कथा (२) झांसीर राजकुमार (३) महामति रानाडे (४) एट्टा कोन युग (५) बाजीराओ (६) शिवाजी उत्सव (७) बंगीय हिंदुजाति कि ध्वंसोन्मुख त्यांपैकी 'महामति रानाडे' व 'एट्टा कोन युग' ही पुस्तके विशेष प्रसिद्ध होती.

[* बंगाली लोकांनी रवींद्रनाथ ठाकुरांना 'विश्वकवि', बंकिमचंद्रांना 'साहित्यसम्राट' व शरतचंद्रांना 'कथाशिल्पी' अशा पदव्या दिल्या आहेत.]

'देशेर कथा' हे पुस्तक अलिपुर बॉंब खटल्यात सरकारने जप्त केले. त्याकाळी बंगालमध्ये ते खूप प्रसिद्ध होते, मोठमोठ्या बंगाली पुढाऱ्यांशी व साहित्यिकांशी त्यांची ओळख होती. बंगभंग आंदोलनाच्या सुमारास सुरू झालेल्या बंगाल मधील शिवाजी उत्सवाचे ते अध्वर्यु होते. त्यांच्याच आग्रहावरून रवींद्रनाथांनी आपली 'शिवाजी उत्सव' ही गाजलेली कविता लिहिली. ह्या कवितेत बंगाली लोकांना उद्देशून रवींद्रनाथ म्हणतात :—

"মারাঠির সাথে আজি হে বাঙালি, এক কণ্ঠে বলো
'জয়তু শিবাজি'।
মারাঠির সাথে আজি হে বাঙালি, এক সঙ্গে চলো
মহোৎসবে সাজি।"

मराठिर साथे आजि हे बाङालि, एक कण्ठे बलो
'जयतु शिवाजि'।
मराठिर साथे आजि हे बाङालि, एक संगे चलो
महोत्सवे साजि।

[अर्थ :- हे बंगाली लोकांनो, मराठी लोकांबरोबरच एका आवाजात 'जयतु शिवाजी' म्हणा आणि त्यांच्याबरोबरच महोत्सवाला सजून चला.]

बंगाली भाषेची उत्पत्ती

प्राचीन भारतांत चार प्रकारच्या भाषा होत्या. (१) आर्यभाषा (इंडो-युरोपीय) (२) द्रविड (३) ऑस्ट्रिक (४) मंगोलीय. आर्यांची भाषा किंवा वैदिकभाषा (ही मौखिक होती) ही आर्यलोक उत्तर हिंदुस्थानांत पसरल्यावर त्यांचा अनार्यांशी संबंध आल्यामुळे विकृत झाली. ख्रि. पू. ५ व्या शतकांत पाणिनीने आपला सुप्रसिद्ध 'अष्टाध्यायी' हा ग्रंथ तयार केल्यावर तिला सूत्रबद्ध स्वरूप प्राप्त झाले. ह्या नवीन भाषेचे नांव 'संस्कृत' भाषा होय. कालक्रमे ह्या संस्कृत भाषेचे प्राकृतांत रूपांतर झाले. [कांही भाषापंडितांचे प्राकृत ही एक स्वतंत्र भाषा आहे असे मत आहे.] ही प्राकृत भाषा पुढे निरनिराळ्या प्रदेशांत निरनिराळ्या रीतीने बोलली जाऊ लागल्यामुळे तिच्या अनेक शाखा निर्माण

झाल्या. त्यांतील मुख्य शाखा (१) मागधी (२) शौरसेनी व (३) महाराष्ट्री या होत. त्यांच्यातही पुढे फेरफार होऊन सध्यांच्या भाषा तयार झाल्या. वैदिक भाषेपासून हल्लीच्या प्रादेशिक भाषांपर्यंत जे स्थित्यंतर होत गेले त्याची पुढील प्रमाणे तीन युगे स्पष्टपणे दिसून येतात.

[१] वैदिक भाषा किंवा आर्य भाषा (ख्रि. पू. १५०० ते ख्रि. पू. ६००)

[२] प्राकृत (ख्रि. पू. ६०० ते इ. स. १०००)

[३] भाषा (इ. स. १००० पासून आतापर्यंत)

प्राकृत व भाषा यांच्या मधल्या काळास (इ.स. ३०० ते इ. स. १०००) अपभ्रंशाचे युग म्हणतात. कारण त्याच काळांत प्राकृतच्या अपभ्रंशाने इतर भाषांची उत्पत्ती झाली.

'महाराष्ट्री प्राकृत' पासून 'महाराष्ट्री अपभ्रंश' व त्यापासून पुढे मराठी भाषेची उत्पत्ती झाली. तर मगधात प्रचलित असलेल्या 'मागधी प्राकृत' पासून 'मागधी अपभ्रंश' व त्यापासून ज्या भाषा तयार झाल्या त्यात बंगाली भाषेचा समावेश होतो. बंगाली भाषेची उत्पत्ती इ. स. च्या ९ व्या शतकात झाली असे मानतात. परंतु बंगदेशातील व्यावहारिक लेखी भाषेला इ. स. १३०० ते १५०० च्या दरम्यान सुरवात झाली. त्यानंतर निश्चित थोडे थोडे फेरफार होत तिला सध्याचे वैभवशाली स्वरूप प्राप्त झाले.

बंगलिपीची उत्पत्ती

भारताच्या प्राचीनतम लिपीचे नांव ब्राह्मी लिपि. ही ब्राह्मी लिपि अत्यंत सरळ व अक्षरांना जोडणारी रेष नसलेली (गुजराती लिपिप्रमाणे) अशी होती. सम्राट हर्षवर्धनच्या काळात (इ. स. च्या ७ व्या शतकात) ब्राह्मी लिपि तीन शाखात विभागली गेली व ती निरनिराळ्या प्रकारांनी लिहू जाऊ लागली. (त्याच सुमारास अक्षरांना जोडणारी रेष लिहिण्यांत येऊ लागली.) त्या तीन शाखा पुढीलप्रमाणे आहेत:—

(१) **उदीच्य** (उत्तर-पश्चिमेकडील):—या शाखेच्या लिपीचे नांव 'शारदा-लिपी' हिच्यापासून काश्मीरी व गुरुमुखीची उत्पत्ती झाली.

(२) **प्रतीच्य** (पश्चिमेकडील) :—या शाखेच्या लिपीचे नांव 'नागरलिपी' यापासूनच देवनागरीची उत्पत्ती झाली. मराठी, गुजराती व राजस्थानी लिप्या देवनागरीच्या थोड्याशा फरकाने उत्पन्न झाल्या आहेत.

(३) **प्राच्य** (पूर्वेकडील) :—या शाखेच्या लिपीचे नांव 'कुटिललिपी'. हिच्या मात्रा व वर्ण कुटिल असल्यामुळेच हिला हे नाव प्राप्त झाले. या कुटिल लिपीपासूनच आधुनिक बंगाली, आसामी, ओरीया व मैथिली लिपींचा विकास झाला. (आसामी बंगलिपीतच लिहिली जाते, फक्त 'व' या अक्षरात फरक आहे.) बंगलिपि ही प्रायः १००० वर्षांपासून प्रचलित आहे. इ. स. च्या ९ व्या शतकांत पाल घराण्यातील राजा नारायण पाल याच्या अमदानीतील भागलपूर जिल्ह्यातील ताम्रपटावर बंगाली लिपि सर्व प्रथम दिसून येते. यानंतरच्या काळात तिच्यात थोडा थोडा बदल होत तिला हल्लीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

बंगलिपिचे वैशिष्ट्य असे आहे की इतर भाषांतील शब्द त्या लिपीत लिहिता येणार नाहीत (उच्चार वेगळे होतील) व बंगाली शब्द (उच्चारांप्रमाणे) इतर लिपीत लिहिता येणार नाहीत.

बांग्ला (बाংলা) नांवाची उत्पत्ती

बंगाली लोक स्वतःच्या भाषेला 'बांगला' भाषा असे म्हणतात. परंतु हे नाव मात्र त्यांनी स्वतः दिलेले नाही. बंगालमध्ये मुसलमानांचा प्रवेश होण्यापूर्वी जो बंगालचा भाग (पूर्व बंगाल) अर्थात बांगला देश आहे त्याला 'वंग' व हल्लीच्या पश्चिम बंगालला 'गौड' असे नामाभिधान होते. मुसलमानी अमदानींत हल्लींच्या पूर्व पाकिस्तान व आसपासच्या भूभागाला 'बांगला' (बाংলা) हे नाव पडले. मुसलमान लोक त्या भागांतील भाषेला 'जबान-इ-बांगला' असे म्हणत. (यापासूनच पुढे 'बांगला' असे म्हणण्यात येऊ लागले.) सर्वसाधारण माणसे तिला 'भाषा' म्हणत तर भाषापंडित तिला 'प्राकृत' म्हणत. इ. स. च्या १६ व्या शतकापासून ते इ. स. च्या १९ व्या शतकापर्यंत तिला 'गौडभाषा' असे म्हटले जाई. हल्ली 'बांगला' (बाংলা, बाঙালা) हेच नाव सर्वत्र वापरले जाते.

बंगाली भाषेतील शब्दसंभार

बंगाली भाषेत प्रायः सव्वा लक्ष शब्द आहेत. त्यांची वर्गवारी पुढील प्रमाणे करण्यांत येते.

(१) तत्सम शब्द (संस्कृत) ४४%

(२) तद्भव व देशी शब्द ५१.४५%

(३) विदेशी शब्द (फारशी-अरबी-तुर्की) ३.३०%, यापैकी सुमारे २५०० शब्द फारशी, ३०० शब्द अरबी व ४० शब्द तुर्की आहेत. मुसलमान राज्यकर्त्यांनी फारशी ही राज्यकारभारची भाषा केल्यामुळे कायदा, अंमलबजावणी व जमीनमहसुलाबाबतचे शब्द फारशी आहेत. मुसलमान धर्माची भाषा अरबी असल्यामुळे तद्विषयक शब्द अरबी आहेत. युद्धविषयक शब्द तुर्की आहेत.

(४) अन्य विदेशी शब्द १.२५%

यात मुख्यतः इंग्रजी भाषेतील शब्दांचा भरणा आहे. सुमारे १०० वर पोर्तुगीज शब्द व इतर किरकोळ शब्द डॅनिश, डच, फ्रेंच व मलायी भाषेतील आहेत.

[हा हिशोब स्वर्गीय ज्ञानेंद्रमोहन दास ह्यांच्या 'बांग्ला भाषार अभिधान' (बांगला भाषेचा अभिधान) ह्या शब्दकोशावरून डॉ. सुनीतिकुमार चटोपाध्याय ह्यांनी केला आहे.]

ह्यावरून असे दिसून येते की संस्कृत भाषेतून बंगाली भाषेत घेतलेल्या शब्दांची संख्या संस्कृत भाषेतून मराठीत घेतलेल्या शब्दांपेक्षा पुष्कळच अधिक आहे. ह्या शब्दांचा वापरही बंगालीत अगदी सामान्य रीतीने होतो. खाली दिलेल्या शब्दावरून त्याची कल्पना येईल. [मूळ बंगाली शब्दासमोर तोच शब्द देवनागरी लिपीत लिहिला असून त्याचा अर्थ दिला आहे.]

अनुष्ठान	अनुष्ठान	समारंभ, धर्मकृत्य
अद्भुत	अद्भुत	आश्चर्यकारक
अभिमान	अभिमान	अहंकार, अभिमान
अल्प	अल्प	थोडे
आपत्ति	आपत्ति	संकट

किन्तु	किन्तु	परंतु
क्रोडपत्र	क्रोडपत्र	पुरवणी
गण्डूष	गण्डूष	चूळ, घोट
गल्प	गल्प	गोष्ट
चमत्कार	चमत्कार	आश्चर्य
निश्चय	निश्चय	निश्चय
परिष्कार	परिष्कार	साफ, स्वच्छ
प्रचुर	प्रचुर	पुष्कळ
प्रवीण	प्रवीण	कुशल
प्रयोजन	प्रयोजन	आवश्यकता
विज्ञ	विज्ञ	ज्ञानी, तज्ञ
विज्ञापन	विज्ञापन	जाहिरात
भद्र	भद्र	सभ्य, चांगला
रौद्र	रौद्र	भयानक
शक्त	शक्त	कठिण, मजबूत
सत्कार	सत्कार	सत्कार
हिंसा	हिंसा	हिंसा

ह्याचप्रमाणे मराठीत मुळींच वापरण्यात न येणाऱ्या संस्कृत शब्दांचा पण बंगालीत अगदी सामान्य रीतीने वापर करतात. खाली दिलेल्या शब्दावरून याची कल्पना येईल.

अनतिक्रम	अनतिक्रम	न ओलांडणे
अनतिदूर	अनतिदूर	जवळ
अनतिविलम्बे	अनतिविलंबे	लवकर
अनल्प	अनल्प	अधिक, पुष्कळ
नातिदूर	नातिदूर	जवळ
नातिविलम्बे	नातिविलंबे	लवकर
नातिशीतोष्ण	नातिशीतोष्ण	कोमट
नातिस्थूल	नातिस्थूल	मध्यम बांध्याचा

संस्कृत भाषेतून बंगालीत घेतलेल्या शब्दांचा संस्कृतमधील अर्थावरोवरच खास बंगाली असा वेगळाही अर्थ होऊं शकतो. खालीं दिलेल्या शब्दांवरून त्याची कल्पना येईल.

অভিমান	अभिमान	रुसवा
আপত্তি	आपत्ति	हरकत
চমৎকার	चमत्कार	आश्चर्यकारक वाटावे इतके छान, सुंदर
নিশ্চয়	निश्चय	निश्चित, नक्की
প্রবীন	प्रवीण	वृद्ध, अगोदरचा (Senior)
রৌদ্র	रौद्र	ऊन
সৎকার	सत्कार	शवदहन, अंत्येष्टिक्रिया
হিংসা	हिंसा	मत्सर

संस्कृतमधून बंगालीत घेतलेल्या काही शब्दांचा अर्थ मराठीतील रूढ अर्थापेक्षा अगदी वेगळा होतो. खाली दिलेल्या शब्दांवरून त्याची कल्पना येईल.

উদ্‌গার	उद्गार	ढेकर, ओकारी
কদাচিৎ	कदाचित्	क्वचितच
কর্কশ	कर्कश	ओबडधोबड, निष्ठुर
কৌতুক	कौतुक	मौजमजा, थट्टा, कुतूहल
চিন্তা	चिंता	विचार
চেষ্টা	चेष्टा	प्रयत्न
ছত্র	छत्र	ओळ
দ্রব্য	द्रव्य	वस्तु
বিলক্ষণ	विलक्षण	पुष्कळ, चांगल्या रीतीने
ভাবনা	भावना	काळजी
যাতাযাত	यातायात	ये–जा

बंगाली भाषेचे प्रकार

शिष्ट साहित्यात व शिक्षित समाजात प्रचलित असलेल्या बंगाली भाषेचे दोन प्रकार आहेत. (१) साधु भाषा (**সাধু ভাষা**; *Standard Literary Language*) (२) चलित भाषा (**চলিত ভাষা**; *Standard Colloquial Language*)

साधु भाषा :–बंगालची साहित्यिक भाषा म्हणून प्रथम साधु भाषेलाच मान होता. गद्यसाहित्य व पत्रे वगैरे याच भाषेत लिहिली जात. ह्या

भाषेचे व्याकरण सुनियंत्रित आहे, तसेच भाषेच्या वापरात गुंतागुंतही नाही. ह्या भाषेत संस्कृत शब्दांचा वापर फार करतात. बंकिमचंद्रांचे व त्यांच्या अगोदरच्या लेखकांचे सर्व साहित्य साधुभाषेत आहे. हल्ली ही भाषा केवळ वृत्तपत्रे व शास्त्रीय ग्रंथापुरतीच मर्यादित आहे.

चलित भाषा :–कलकत्त्याच्या मौखिक भाषेवर आधारलेल्या भाषेला चलित भाषा असे म्हणतात. सध्या साहित्यिक भाषा म्हणून ह्या भाषेलाच मान आहे. हिच्यात संस्कृत शब्दांचा वापर कमी करून, तद्भव, देशी व विदेशी शब्दांचा वापर फार करतात. साधु भाषेतील सर्वनामांच्या व क्रियापदांच्या रूपांत थोडाफार फेरफार करून चलित भाषेतील सर्वनामांची व क्रियापदांची रूपे तयार होतात. क्वचित् नामांतही फेरफार करतात. चलित भाषेच्या वापरांत गुंतागुंत फार आहे.

साधुभाषेत गंभीरता आहे, अभिजात सौंदर्य आहे. चलित भाषेत त्याचा अभाव आहे. परंतु चलित भाषेत जी गतिमानता आहे ती साधु भाषेत नाही. साधु भाषा पोक्त व्यक्तिप्रमाणे वाटते तर चलित भाषा अल्लड बालिकेप्रमाणे वाटते. चलित भाषेत काही भाव अशा रीतीने व्यक्त करता येतात की ते साधुभाषेत व्यक्त करता येत नाहीत. नाटकात व गोष्टीत साधु भाषेतील बोलणे अगदी कृत्रिम वाटते तर चलित भाषेतील बोलणे अगदी स्वाभाविक वाटते.

बंगाली भाषेची वैशिष्ट्ये

बंगाली भाषेत संस्कृत शब्दांचे प्राचुर्य असले तरी त्या शब्दांचे उच्चार मात्र आपण करतो तसे बंगालीत करीत नाहीत. उच्चारांच्या बाबतीत बंगालीचे वेगळेपण खास जाणवते. केवळ बंगालीतील संस्कृत शब्दांचेच उच्चारण वेगळ्या पद्धतीने करतात असे नव्हे तर संस्कृत वाचनानासुद्धा (बंगाली लिपीत लिहिले जात असल्यामुळे) ते बंगाली पद्धतीनेच वाचतात. 'अमृतं तु विद्या' हे बंगालीत 'অমৃতং তু বিদ্যা' असे लिहिले जाऊन 'ओम्रितोड् तु विद्या' असे उच्चारले जाते. लिहिताना शब्द संस्कृतप्रमाणे लिहावयाचा परंतु उच्चार मात्र बंगाली पद्धतीने करावयाचा ह्या द्वैतामुळे नवशिक्यास बंगाली भाषेतील छापलेले वाक्य समजले तरी तेच वाक्य उच्चारले असता समजत नाही.

बंगाली भाषेत नामांची व सर्वनामांची रूपे, तसेच क्रियापदांची रूपे ह्यांखेरीज फारच थोडे व्याकरण आहे. बंगाली व्याकरणात ह्याखेरीज इतर विषय जे येतात ती केवळ संस्कृत व इंग्रजी व्याकरणाची उसनवारी होय. नामांना व सर्वनामांना लागणारे विभक्ति-प्रत्यय, ते विभक्ति-प्रत्यय लागून रूपे कशी तयार होतात, तसेच धातूना निरनिराळ्या काळी लागणारे प्रत्यय व ते लागून क्रियापदाची रूपे कशी तयार होतात एवढी माहिती झाली की लेखी बंगाली भाषा (विशेषत: साधु भाषा) समजण्यास अडचण पडत नाही. शब्दाचे लिंग जरी ठाऊक नसले तरी योग्य तो विभक्तिप्रत्यय वापरल्यास शब्दरूपात चूक होत नाही. त्याचप्रमाणे क्रियापदांची रूपे, लिंग व वचनाप्रमाणे न बदलता केवळ पुरुषांप्रमाणे बदलत असल्यामुळे प्रत्येक काळाची केवळ सहा रूपे ठाऊक असली की काम भागते. ह्यामुळे पुष्कळदा उल्लेखिलेली व्यक्ति स्त्री आहे की पुरुष आहे हे केवळ संदर्भावरून जाणावे लागते. ह्याच पुस्तकात भाषांतराकरिता उतारे ह्या भागात बंकिमचंद्राचा जो उतारा दिला आहे त्यात 'कुंद' नांवाची व्यक्ति स्त्री आहे की पुरुष हे केवळ एका विशेषणांवरून (धुला वलु ठिता; धुल्यवलुण्ठिता) व तेसुद्धा बंकिमचंद्रांची भाषा संस्कृत-प्रचुर असल्यामुळे समजते. तिथे जर बंगाली विशेषण वापरले गेले असते तर अख्खा उतारा वाचूनसुद्धा त्याचा पत्ता लागला नसता.

बंगाली भाषेत विशेष आंखीव [धड़ाबाँधा (धराबांधा), बाँधाधड़ा (बांधाधरा), बाँधाबाँधि (बांधाबांधि)] असे नियम नाहीत. त्यामुळे घोकंपट्टीला वाव मुळीच नाही, असे म्हटल्यास ते गैर होणार नाही. परंतु आखीव नियम नसल्यामुळे शब्दांच्या वापराकडे विशेष लक्ष द्यावे लागते. एकच शब्द निरनिराळ्या अर्थी वापरला जातो ह्याची कल्पना खालील उदाहरणांवरून येईल.

১) হইতে (हइते)

(অ) গাছ হইতে ফল পড়িল।

गाछ हइते फल पड़िल।

झाडावरून फळ पडले.

(হইতে-विभक्तिसूचक अव्यय)

(आ) आमि बड़ हइते एखाने आसियाछि।

आमि बड़ हइते एखाने आसियाछि।

मोठा होण्याकरिता मी येथे आलो आहे.

(हइते–असमापिका क्रिया)

(इ) पड़ाशुना करिले तुमि बड़ हइते।

पड़ाशुना करिले तुमि बड़ हइते।

अभ्यास केला असतास तर तू मोठा झाला असतास.

(हइते–रीतीभुतकाळी क्रियापद)

(ई) राम हइते श्याम भाल।

राम हइते श्याम भाल।

रामपेक्षा श्याम चांगला आहे.

(हइते–दोन वस्तूतील तुलना व्यक्त करताना वापरण्यात येणारे तुलनादर्शक किंवा तर वाचक अव्यय)

(उ) काल हइते तुमि एइ काज करिबे।

काल हइते तुमि एइ काज करिबे।

उद्यापासून तू हे काम करावेस.

(हइते-अव्यय)

२) नाइ (नाइ)

(अ) नाइ मामार चेये काना मामा भाल।

नाइ मामार चेये काना मामा भाल।

मामा नसण्यापेक्षा आंधळा मामा चांगला.

(नाइ–विशेषण)

(आ) तिनि एखाने नाइ।

तिनि एखाने नाइ।

ते येथे नाहीत

(नाइ–क्रियापद)

(ई) আমি কিছুই করি নাই।
আমি किछुई करि नाइ।
मी कांहींही केले नाहीं.
(নাই अव्यय)

७) রাম (राम)
(अ) मराठीप्रमाणेच श्रीरामचंद्र असा अर्थ होतो.
(आ) शब्दारंभी आल्यास 'রাম' चा आकाराने मोठा असा अर्थ होतो. उदा. রাম ছাগল (राम छागल)-मोठ्या आकाराचा बकरा. রামধনু (रामधनु)-इंद्रधनुष्य
(इ) शब्दाच्या शेवटी आल्यास श्रेष्ठ (व्यंग्यार्थी) असा अर्थ होतो. उदा. (বোকারাম (बोकाराम)-मूर्खशिरोमणी.
(ঈ) तिरस्कार व्यक्तविण्याच्या वेळी 'রাম' चा अव्ययाप्रमाणे उपयोग होतो. उदा. রাম বল। (राम बल)

बंगाली मौखिक भाषेत विशेष करुन अशा দারুণ (दारुण), ভীষণ (भीषण) इत्यादि विशेषणे अगदी साध्या व सरळ अर्थाने वापरतात. मराठीतल्याप्रमाणे त्यांचा 'भयंकर' असा अर्थ न करता 'फारच' असा अर्थ करावा.

उदा. (१) আজ দারুণ গরম হচ্ছে।
आज दारुण गरम हच्छे।
आज फारच उकडत आहे.

(२) মেয়েটি ভীষণ সুন্দরী।
मेयेटि भीषण सुन्दरी।
ती मुलगी फारच सुंदर आहे.

प्रस्तावनेत बंगाली भाषा कां शिकावी, बंगाली भाषेची व तिच्या लिपीची उत्पत्ती कशी झाली, बांगला हे नांव तिला कसे पडले, बंगाली भाषेचा शब्दसंभार, बंगाली भाषेचे प्रकार व तिची वैशिष्टे यांविषयीची माहिती दिल्यावर त्याच्या पुढील 'विषयप्रवेश' या सदराखाली या पुस्तकाचा कशा रीतीने उपयोग केल्यास बंगाली भाषा लवकर व उत्तम रीतीने शिकता येईल ते दिले आहे. तेव्हा विषयप्रवेश वाचूनच मग पुस्तकाचा अभ्यास करण्यास सुरवात करावी.

विषयप्रवेश

प्रौढ व शिक्षित मराठी भाषिकास सहजगत्या बंगाली भाषा बोलायला यावी, त्या भाषेतील लिखित साहित्य (वृत्तपत्रे, मासिके वगैरे) वाचता यावे आणि त्या भाषेत व्यवहारापुरते लिहिताही यावे असा महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाच्या आंतर-भारती मालेतील बंगाली भाषा प्रवेशाचा उद्देश आहे. या उद्देशास अनुसरून बंगाली भाषेचा सर्वांगीण परिचय करून द्यावयाचा ह्या पुस्तकात प्रयत्न करण्यात आला आहे. पुस्तकाचे तीन भाग करण्यात आलेले आहेत. पहिल्या भागात बंगाली भाषेच्या लिपीची व उच्चारण पध्दतीची (जोडाक्षरांसह) माहिती देण्यात आली आहे. दुसऱ्या भागात बंगाली भाषेच्या व्याकरणाची संपूर्ण माहिती भाषांतर व पत्रलेखन आलेली आहेत, तर तिसऱ्या भागात व्यवहारोपयोगी शब्द-संग्रह दिलेला आहे. पहिल्या दोन भागांचा नीट काळजीपूर्वक अभ्यास केल्यास बंगाली भाषा समजण्यास व लिहिण्यास कोणतीही अडचण येणार नाही असे म्हटल्यास ते योग्यच ठरेल असा विश्वास वाटतो.

पुस्तकाचा अभ्यास करण्याची रीत

बंगाली भाषा शिकताना लिपि व उच्चार ह्या अडचणी सर्वप्रथम येतात. बंगाली भाषेत शब्द लिहावयाचा एका तऱ्हेने व त्याचा उच्चार करावयाचा दुसऱ्या तऱ्हेने (आपल्या दृष्टीने) अशी पध्दत आहे. उच्चार शक्यतो कोमल व श्रुतिमधुर (कानास गोड) करण्याच्या बंगाली लोकांच्या प्रवृत्तीमुळे त्यांनी हे द्वैत पत्करले आहे. त्यामुळे बंगाली भाषेला गोडी पण आलेली आहे. विश्वकवी रवींद्रनाथ ठाकुरांच्या 'गीतांजली'तील कवितेच्या खाली दिलेल्या दोन कडव्यांवरून ह्यांची कल्पना येईल.

बंगाली लिपि	देवनागरी लिपि
অন্তর মম বিকশিত করো	अंतर मम विकशित करो
অন্তরতর হে।	अन्तरतर हे।
নির্মল করো উজ্জ্বল করো,	निर्मल करो, उज्ज्वल करो,
সুন্দর করো হে ॥	सुन्दर करो हे ॥१॥

জাগ্রত করো, উদ্যত করো,	जाग्रत करो, उद्यत करो,
নির্ভয় করো হে।	निर्भय करो हे।
মঙ্গল করো, নিরলস	मङ्गल करो निरलस निःसंशय
নিঃসংশয় করো হে।	करो हे।
অন্তর মম বিকশিত করো	अंतर मम विकशित करो
অন্তরতর হে।	अन्तरतर हे ॥ २ ॥

बंगाली उच्चारात ही दोन कडवी पुढीलप्रमाणे लिहिता येतील.

ऑन्तोरो मॉमो विकोशितो कॉरो,
ऑन्तोरोतॉरो हे।
निरमॉलो कॉरो, उजजॉलो कॉरो
शुन्दॉरो कॉरो हे ॥ १ ॥
जाग्रोतो कॉरो, उद्दॉतो कॉरो,
निरभॉयो कॉरो हे।
मॉडगॉलो कॉरो, निरॉलॉशो निशशॉङ् शॉयो
कॉरो हे।
आन्तोरो मॉमो विकोशितो कॉरो
ऑन्तोरोतॉरो हे ॥ २ ॥

वरील दोन कडवी देवनागरी लिपीत लिहिल्याप्रमाणे वाचल्यास बंगाली भाषेचा गंधही नसताना कोणलाही अर्थ सहज समजेल; परंतु तीच बंगाली उच्चारात लिहिल्याप्रमाणे वाचल्यास फारसा अर्थबोध न होता केवळ परिचित शब्दांचे विकृत उच्चारण केल्यासारखे वाटेल. बंगाली लिपीत लिहिले असता अर्थातच काहीच वाचता येणार नाही.

ह्या मुख्य अडचणी दूर करण्याकरिता पहिल्या भागात सुरवातीलाच लिपि-परिचय करून दिला असून नंतर उच्चारण पद्धतीची माहिती दिलेली आहे. (उच्चारण पध्दतीचा पाठ सुरवातीला न वाचता त्याचा संदर्भ म्हणून उपयोग करावा.) केवळ लिपीची माहिती करून घेण्यापेक्षा सोपे सोपे शब्द लिहिण्याचा व वाचण्याचा सराव केल्यास बरे पडते. ह्या दृष्टीने पाठ तीन मध्ये निरनिराळे शब्द दिलेले आहेत व त्यांच्या बाजूला त्यांचे उच्चार दिलेले

आहेत. ते शब्द लिहावे व त्याप्रमाणे उच्चार करावा. उच्चारामध्ये एखादी शंका आल्यास पाठ दोनचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. बंगालीतील जोडाक्षरे जरा क्लिष्ट असल्यामुळे त्यांचा नीट अभ्यास करणे भाग पडते. ह्या दृष्टीने पाठ चार, पांच व सहा हे लिहिलेले आहेत. जोडाक्षरांच्या बेळी पण उच्चारण बेगबेगळ्या तऱ्हेने होत असल्यामुळे जोडाक्षरयुक्त शब्दांच्या बाजूला त्यांचे उच्चार दिलेले आहेत. हे जोडाक्षरयुक्त शब्द लिहावे व त्यांचा दिलेल्या उच्चारप्रमाणे उच्चार करावा. याही बेळी एखादी शंका आल्यास पाठ दोनचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. पाठ तीन ते सहा मध्ये केवळ वाचण्याची संवय व्हावी ह्या हेतुनेच वाक्ये देण्यात आली आहेत. त्यांचा अर्थही जरी खाली देण्यात आला आहे तरी नामांची व सर्वनामांची रूपे, तसेच विभिन्न काळातील क्रियापदांची रूपे ह्यांचा अभ्यास होईपर्यंत तिकडे विशेष लक्ष देऊ नये. इंग्रजी शब्द आपण जसा उच्चार करतो तसाच मराठीत लिहितो, परंतु बंगालीत उच्चारण थोडे विकृत होत असल्यामुळे इंग्रजी शब्द बंगालीत बेगळ्या पद्धतीने लिहिले जातात. तिची कल्पना सातव्या पाठात करून देण्यात आलेली आहे. प्रत्येक पाठात अभ्यास दिलेले आहेत ते सोडवावे. एवढा अभ्यास झाला की कोणताही शब्द बंगाली लिपीत कसा लिहावा व कोणत्याही बंगाली शब्दाचा उच्चार कसा करावा ह्याचे पूर्ण ज्ञान होईल.

यानंतर

यद्यपि बहु नाधीषे तथाऽपि पठ पुत्र, व्याकरणम् ।
स्वजनः श्वजनो मा भूत्सकलं शकलं सकृच्छकृत ॥

ह्या सुभाषितानुसार बंगाली भाषेच्या व्याकरणाला सुरवात करावी. दुसऱ्या भागांतील पहिला व दुसरा हे पाठ नुसते वाचून काढावेत. ह्यात मराठी भाषिकांना नवीन किंवा न समजण्यासारखे असे काहीही नाही. तिसऱ्या पाठात कारक व विभक्ति ह्यांची माहिती व चौथ्या पाठात नामांची व सर्वनामांची रूपे दिलेली आहेत. विभक्ति प्रत्यय लक्षात ठेवण्यास ही रूपे सहजच समजतील. संस्कृतप्रमाणे नामांची व सर्वनामांची रूपे पाठ करण्याची मुळीच आवश्यकता नाही. पाचव्या पाठात बंगालीतील साधुभाषा व चलित भाषा ह्यांविषयी माहिती देण्यात आली आहे. केवळ नामांमध्ये व सर्वनामांमध्ये

होणारा फरक येथे दाखविला असून क्रियापदांच्या रूपात होणारा फरक, त्या त्या काळातील साधुभाषेतील रूपांबरोबरच दाखविण्यात आला आहे.

महाव्या पाठापासून कालांना सुरवात झाली आहे. या पाठांत बंगालीतील 'मौलिक कालां'ची (*Original tenses*) निरनिराळ्या धातूंची रूपे देण्यात आली आहेत. त्याचबरोबर त्या त्या कालातील वाक्ये भाषांतरासह दिलेली आहेत. या पाठापासून बंगाली भाषेच्या व्याकरणशुद्ध अभ्यासाला पद्धतशीर सुरवात करावी. जिथे जिथे अडचण पडेल तिथे तिथे मार्गील पाठांचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. अभ्यासकारेता दिलेल्या मराठी वाक्यांचा बंगालीत अनुवाद करण्याचा प्रयत्न करावा. प्रथम जड जात असल्यास सर्व कालांचा नीट अभ्यास झाल्यावर अनुवाद करण्यास सुरवात करावी. सातव्या पाठात 'असमापिका क्रिया' दिलेल्या आहेत. त्यांची रूपे समजणे मुळीच कठीण जाणार नाही व ही रूपे समजल्यावर आठव्या पाठात दिलेल्या 'यौगिक कालां'ची (*Compound tenses*) रूपे समजण्यात मुळीच अडचण येणार नाही. नवव्या पाठांत बंगालीतील अर्थांची (*Moods*) माहिती देऊन 'अनुज्ञा'ची (*Imperative Mood*) रूपे देण्यात आली आहेत. दहाव्या पाठांत क्रियावाचक नामे, औचित्यार्थक, प्रश्नार्थक व नकारार्थक वाक्ये दिलेली आहेत.

एवढा अभ्यास झाल्यास बंगाली भाषेचे प्राथमिक व अत्यावश्यक ज्ञान झाले असे म्हणता येईल. भाषेच्या वापराच्या दृष्टीने कालांचा वापर, निर्देशक व अनिर्देशक प्रत्यय, विभक्ति प्रत्ययांचा वापर याकडे विशेष लक्ष द्यावे लागते. या दृष्टीने पाठ अकरा, बारा व तेरा लिहिले आहेत. चौदाव्या पाठात विशेषणांचा तर तम भाव व पंधराव्या पाठांत धातूचे प्रकार व त्यांचा वापर कसा करतात ते दाखविले आहे. सोळाव्या पाठांत अव्ययांचा वापर कसा करतात हे दाखविले आहे. या पाठाच्या शेवटच्या भागात अव्ययांचा वापर केलेली निरनिराळी वाक्ये दिलेली आहेत, ती फारच उपयुक्त ठरतील. सतराव्या पाठात एकाच शब्दाचे निरनिराळे अर्थ कसे होतात हे दाखविण्याकरिता काही नामे, विशेषणे व क्रियापदे घेऊन त्यांची निरनिराळ्या अर्थी वेगवेगळी वाक्ये दिली आहेत. अठराव्या पाठात जे काळ दिलेले आहेत त्यांचे मराठीत शब्दशः

भाषांतर नीट करता येत नाही परंतु बंगालीत ते काळ कसे वापरले जातात हे समजण्याकरिता त्यांची रूपे व त्या काळांची वाक्ये दिली आहेत. त्याच पाठाच्या "इतर काळ व बंगालीतील विविध रचनांची वाक्ये" ह्या सदराखाली काही वाक्ये भाषांतरासह दिली आहेत. काही वाक्यांचे मराठीतून बंगालीत शब्दशः भाषांतर करणे अवघड जाते, त्याकरिता तशीही काही बंगाली वाक्ये दिली आहेत.

प्रयोग व प्रत्यक्ष-परोक्ष कथन यांची माहिती अभ्यासूला आवश्यक आहे. या दृष्टीने एकोणीसावा पाठ लिहिला आहे. या नंतर विसाव्या पाठात बंगाली वाक्यरचनेची माहिती दिली आहे. ती बंगालीतून मराठीत व मराठीतून बंगालीत भाषांतर करताना उपयुक्त ठरेल. विरामचिह्नांची आवश्यकता प्रत्येक भाषेत असल्यामुळे एकविसाव्या पाठांत त्यांची माहिती दिली आहे. संधि 'ण'त्व व 'ष'त्व तसेच समास हे कोणत्याही भारतीय भाषेच्या व्याकरणातील आवश्यक भाग असतात. बंगालीही त्याला अपवाद नाही. बावीस, तेवीस व चोवीस हे पाठ या दृष्टीने लिहिले आहेत. विशेष अभ्यास करणाराने त्याच अभ्यास करावा. शब्द-प्रकरणाचा पंचविसावा पाठ बंगाली भाषेच्या अभ्यासाच्याच्या दृष्टीने मनोरंजक व उपयुक्त ठरेल. या पाठात बंगालीत शब्द कोणत्या भाषांतून घेतले आहेत, द्विरुक्त शब्द, ध्वन्यात्मक शब्द, कृत् व तद्धित प्रत्ययांमुळे शब्द कसे तयार होतात व त्यांचा अर्थ कसा होतो वगैरे सविस्तर दिलेले आहे. या पाठाचा नीट अभ्यास न केल्यास बंगालीचा अभ्यास पूरा झाला नाही असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही.

कोणत्याही भाषिक लोकांच्या ज्ञानाचा साठा त्यांच्या भाषेतील विशिष्टार्थक शब्दात, वाक्प्रचारात व म्हणीत दिसून येत असल्यामुळे बंगालीतील विशिष्टार्थक शब्द, वाक्प्रचार व म्हणी सत्तावीसाव्या पाठात देण्यात आल्या आहेत. सत्तावीसाव्या पाठात व्यवहारोपयोगी वाक्ये निरनिराळ्या सदरात दिलेली आहेत. भाषांतराचे नमुने व भाषांतराकरिता काही उतारे अठ्ठाविसाव्या पाठात दिले आहेत. प्रत्येक भाषेतील पत्रलेखनाची पद्धत (मजकूर वगळता) वेगळी-वेगळी असते. बंगालीतील पत्रलेखनाची पद्धत नीट समजण्याकरिता एकोणतीसावा पाठ लिहिला आहे.

वर दर्शविल्या पद्धतीने ह्या पुस्तकाचा अभ्यास केल्यास बंगाली भाषा कोणाच्याही मदतीशिवाय सहज शिकता येईल. बंगाली उच्चारांचा व दुसऱ्या भागातील दहाव्या पाठापर्यंतचा अभ्यास नीट झाल्यावर बंगाली लोकांच्या सहवासाची जोड मिळाल्यास बंगाली भाषेत प्रगति करणे सोपे जाईल. ते जमण्यासारखे नसल्यास बंगाली सिनेमा व नाटके पहावीत, कलकत्ता नभोवाणीवरील कार्यक्रम ऐकावेत, त्यानेही चांगलाच फायदा होईल.

पाठ १ ला : अक्षर परिचय

অক্ষয় পরিচয়

(ओक्खोर् पोरिचॉय्)

१

स्वरवर्ण (बंगाली अक्षर)	स्वरवर्ण (सर्वसाधारण उच्चार)	श्शॉर् बॉर्नो (देवनागरी अक्षर)
অ	ऑ	अ
আ	आ	आ
ই	इ	इ
ঈ	इ	ई
উ	उ	उ
ঊ	उ	ऊ
ঋ	रि	ऋ
ঌ	लि	ऌ
এ	ए	ए
ঐ	ओइ	ऐ
ও	ओ	ओ
ঔ	ओउ	औ

टीपा :–(१) ऋ, ऌ. ॲ, ऐ, ऒ, औ, ह्या स्वरांवर रेफ नाही. 'ए' व 'ओ' वर रेफ दिल्याम अनुक्रमे त्र–त्र व क्त–क्त ही जोडाक्षरे होतात. शब्दावरील रेफेस मात्रा (भात्रा) असे म्हणतात.

(२) ९ हे अक्षर सध्या स्वर म्हणून वापरत नाहीत; ९ ही संख्या दर्शविण्याकरिता वापरतात.

(३) ॠ व ॡ हे दोन स्वर अनुक्रमे ऋ व ऌ असे आहेत. परंतु सध्या ते प्रचारात नसल्यामुळे स्वरवर्णांमध्ये दिलेले नाहीत.

(४) कलकत्ता विश्वविद्यालयाच्या नवीन नियमानुसार 'ऑ' ला द्वितीय स्वरवर्ण मानतात. साधारणतः इंग्रजी शब्दातील सुरवातीच्या 'a' चा जेव्हा 'ॲ' असा उच्चार होतो त्याबद्दल वापर करतात. जसे :–
ॲसिड (Acid); ॲलिउमिनिअम (Aluminium)
ऑ! (केवलप्रयोगी अव्यय; मराठीत आं ह्या अर्थी)

अभ्यास (१)

पुढील स्वर वर्ण ओळखा

ঔ	অ	ই	ঐ
ঋ	এ	ও	ঊ
ঈ	৯	ঊ	আ

२

व्यञ्जनवर्ण (बंगाली अक्षर)	व्यंजन वर्ण (सर्वसाधारण उच्चार)	व्यान्‌जोन् बॉर्नो (देवनागरी अक्षर)
ক	কॉ	क
খ	খॉ	ख
গ	গॉ	ग
ঘ	ঘॉ	घ
ঙ	ঙॉ	ङ

ব্যঞ্জনবর্ণ (বंगाली अक्षर)	व्यंजन वर्ग (सर्वसाधारण उच्चार)		ब्यान्जोन् वर्नो (देवनागरी अक्षर)
চ	चॉ	मृदु उच्चार	च
ছ	छॉ		छ
জ (বর্গীয়)	जॉ (वर्गिओ)		ज (वर्गीय)
ঝ	झॉ		झ
ঞ	ञॉ		ञ
ট	टॉ		ट
ঠ	ठॉ		ठ
ড	डॉ		ड
ঢ	ढॉ		ढ
ণ	णॉ		ण
ত	तॉ		त
থ	थॉ		थ
দ	दॉ		द
ধ	धॉ		ध
ন	नॉ		न
প	पॉ		प
ফ	फॉ		फ

ব্যঞ্জনবর্ণ बंगाली अक्षर	व्यंजन वर्ण (सर्वसाधारण उच्चार)	व्यान्जोन बॉर्नो (देवनागरी अक्षर)
ব	बॉ	ब
ভ	भॉ	भ
ম	मॉ	म
য (অন্তস্থ)	जॉ (आन्तोस्थो)	य (ज अंतस्थ)
র	रॉ	र
ল	लॉ	ल
ব	बॉ	व
শ	शॉ	श
ষ	शॉ	ष
স	शॉ	स
হ	हॉ	ह
ড়	'ड' व 'र' यांच्या मधला ऑकार	हे दोन्ही उच्चार मराठीत नाहीत
ঢ়	'ड्ह' असा मिश्र ऑकार	
য়	यॉ	य
ৎ (খণ্ড'ত')	त् (खॉण्डो'तॉ)	त्
ং		अनुस्वार
ঃ		विसर्ग
ঁ		चंद्रबिंदु

टीपा : (१) খ, গ, ঙ, ঞ, ণ, থ, প, শ पैकी काही अक्षरावर रेष (মাত্রা-मात्रा) नाही तर काही अक्षरापुढे लिहिण्याच्या व टाईपच्या सोईकरिता रेष आहे. 'ত' ह्या अक्षरावर रेष न दिल्यास ३ ही संख्या होते.

(२) 'ळ' हे अक्षर बंगालीत नाही. मराठीतील 'ळ' बद्दल बंगालीत 'ল' लिहितात.

उदा. गोपाळ (গোপাল) बाळकराम (বালকরাম)

'क्ष' व 'ज्ञ' ही अक्षरे अनुक्रमे क् + ष व ज् + ञ ह्यांची जोडाक्षरे समजली जातात व ক্ষ (क्ष) व জ্ঞ (ग्यं) अशी लिहिली जातात.

(३) 'व' ह्या मूळाक्षराचा बंगालीत सर्वत्र 'ब' असाच उच्चार करतात. स्वतंत्र 'व' असा उच्चार करीत नाहीत.

(४) शब्दाच्या शेवटी मराठीत 'त' आल्यास त्या ठिकाणी बंगालीत 'ৎ' हे अक्षर वापरतात.

उदा. जगत् (জগৎ), सत् (সৎ), महत् (মহৎ)

'त्' पुढे स्वर किंवा व्यंजन आल्यास संधिनियमाप्रमाणे संधि होतो.

उदा. জগৎ + ঈশ = জগদীশ

সৎ + চরিত্র = সচ্চরিত্র

(५) मराठीत 'ज' हे अक्षर असते तेव्हा बंगालीत 'জ' (वर्गीय ज) वापरतात.

उदा. जखम (জখম), जटिल (জটিল),

जठर (জঠর), जीवाणु (জীবাণু)

मराठीत शब्दाच्या सुरवातीला जेव्हा 'य' हे अक्षर असते तेव्हा बंगालीत 'য' (अन्तस्थ ज) वापरतात.

उदा. यथा (যথা), यवन (যবন), यम (যম), यश (যশ)

मराठीत 'य' हे अक्षर शब्दाच्या मध्ये असते तेव्हा बंगालीत काही अपवाद वगळल्यास 'য়' हे अक्षर वापरतात. शब्दाच्या शेवटी 'य' असल्यास बंगालीत नेहमी 'য়' हेच अक्षर वापरतात.

उदा. समय (সময়), जय (জয়), पलायन (পলায়ন), शयन (শয়ন)

मराठीत अ, नि, वि, सु, सं इत्यादि उपसर्गाच्या पुढे 'य' अक्षर असते तेव्हां बंगालीत 'য' (अन्तस्थ ज) वापरतात.

उदा. अयुग्म (अयुग्), नियुक्त (नियुक्), वियुक्त (वियुक्), सुयोग (सुयोग), संयोग (संयोग), अपवाद वियोग (बिपोग)

(६) अनुस्वार व विसर्ग बंगालीत अक्षरापुढे लिहितात.

उदा. सिंह (सिंहो), संशय (शॉंशोय) दुःख (दुक्खो), निःशेष (निशेश्)

काही ठिकाणचे अनुस्वार लिहिण्यात बंगालीत थोडा फरक आहे तो असा मराठीत बहुतेक अक्षरांच्या डोक्यावर बिंदु देतात; पण बंगालीत (संस्कृतप्रमाणेच) त्याबदल बऱ्याच ठिकाणी पुढील वर्णाचे अनुनासिक वापरतात. जसे :

मराठीत	बंगालीत
अंक	अङ्क (ओङ्को)
संचार	सञ्चार (शॉन्चार्)
विलंब	बिलम्ब (बिलोम्बो)
घंटा	घण्टा (घॉण्टा),
अनंत	अनन्त (ओनोन्तो)

(७) चंद्रबिंदु अक्षरांच्या डोक्यावर काढतात. जसे :
अाँठि (आंठि), गोसाँई (गोशांइ.)

[चंद्रबिंदुसारखेच परंतु उजवीकडची बाजू लांब असलेले असे ७ चिन्ह बंगालीत आहे. ह्या चिन्हाला 'ईश्वर' (इश्शोर ही संज्ञा आहे. हे चिन्ह हिन्दु देवता, मनुष्यव्यक्ति किंवा तीर्थक्षेत्राच्या नावांच्या अगोदर लिहितात. जसे :

(१) ৺শ্রীশ্রীদুর্গা (शिश्रिदुर्गा)

(२) ৺যদুগোপাল মুখোপাধ্যায় (जोदुगोपाल मुखोपाध्याय)

(३) ৺বারানসী (बारानोशी)

हल्ली हे चिन्ह चंद्रबिंदुप्रमाणेच (उजवीकडची बाजू लांब न काढता) लिहिण्याचा प्रघात आहे.]

(८) बंगालीत 'ॐ' हा 'ওঁ' किंवा 'ওম্' असा लिहितात.

(९) ঙ, ঞ, ণ, ড়, ঢ়, য, ৎ ही व्यंजने बंगालीत शब्दारंभी कधीच येत नाहीत. ड़ व ढ़ ही व्यंजने शब्दाच्या मध्ये व य (अन्तस्थ ज) शब्दाच्या

शेवटी कधीच येत नाहीत. ড় हे व्यंजन शब्दाच्या मध्ये किंवा शेवटी येते तर ঢ় हे व्यंजन सर्वसाधारणपणे शब्दाच्या शेवटीच येते.

(१०) पुढील अक्षरांतील फरक लक्षात घ्यावा :

ব, র, ক	ড, ড়, উ, ঊ
য, য়, ষ	ঢ, ঢ়, ট
খ, থ	ঋ, ঝ
ঘ, ধ	ত, অ
ণ, ন	ম (लिखी), স
হ, ই	

अभ्यास (२)

पुढील व्यंजनवर्ण ओळखा

ব	জ	ম	ঢ	গ	ঞ	ড	ং
ক	ড়	খ	ল	শ	প	ঙ	ন
ৎ	ষ	দ	চ	ঠ	ণ	য	ঝ
ধ	ট	থ	ং	হ	ভ	ঃ	র
ফ	য়	ছ	ঢ়	ঘ	ত	স	

২

स्वर :–

बंगालीत स्वर दोन प्रकारचे आहेत.

(१) ह्रस्व (হ্রস্ব — ह्रॉश्शो)

(२) दीर्घ (দীর্ঘ — दिर्घो)

ह्रस्व स्वर (হ্রস্ব স্বর) : অ, ই, উ, ঋ, ঌ

दीर्घ स्वर (দীর্ঘ স্বর) :– আ, ঈ, ঊ, এ, ঐ, ও, ঔ

व्यंजन :–

ক, চ, ট, ত, প ही व्यंजने अकारयुक्त आहेत. [ক্+অ=ক; চ্+অ=চ] मूळ व्यंजनवर्णाबरोबर स्वरवर्ण नसल्यास त्या व्यंजन-वर्णाला 'হসন্ত' (हॉशॉन्तो) किंवा 'হলন্ত' (हॉलोन्तो) म्हणतात.

'हसन्त' वर्णाच्या शेवटी (्) हे चिन्ह असते. उदा. क्, ख्, च्, छ्, इत्यादि (्) चिन्हाला **'हसचिह्न'** (हॉशचिन्नो) म्हणतात.

क पासून म पर्यंतच्या पंचवीस व्यंजनवर्णांना स्पर्श वर्ण **स्पर्शवर्ण** (स्पॉरशो बॉर्नो) म्हणतात. त्यांचे पांच भाग पडतात. प्रत्येकाला वर्ग **वर्ग** (बॉर्गो) म्हणतात.

क्, ख्, ग्, घ्, ङ्,	क - वर्ग (क-वर्ग)
च्, छ्, ज्, झ्, ञ्	च - वर्ग (च-वर्ग)
ट्, ठ्, ड्, ढ्, ण्	ट - वर्ग (ट-वर्ग)
त्, थ्, द्, ध्, न्	त - वर्ग (त-वर्ग)
प्, फ्, ब्, भ्, म्	प - वर्ग (प-वर्ग)
य्, र्, ल्, व्	अंतस्थ वर्ण (अन्तस्थ वर्ण) -(ऑन्तोस्थो बॉर्नो)
श्, ष्, स्, ह्	उष्मवर्ण (**ऊष्मवर्ण**)-(उशमो बॉर्नो)

उच्चारण स्थानानुसार स्वरवर्ण व व्यंजनवर्ण त्यांचे पुढीलप्रमाणे भाग पडतात.

स्वरवर्ण	व्यंजनवर्ण	नाम (नाम - नांव)
अ, आ	क-वर्ग, ह्,	**कण्ठ्य** (कोण्ठो-कण्ठ्य)
इ,ई	च-वर्ग, य्, श्,	**तालव्य** (तालोव्वो-तालव्य)
ऋ	ट-वर्ग, र्, ष्,	**मूर्धन्य** (मुरधोननो-मूर्धन्य)
ऌ	त-वर्ग, ल्, स्	**दन्त्य** (दोननो-दन्त्य)
उ, ऊ	प-वर्ग	**ओष्ठ्य** (ओशठो-ओष्ठ्य)
ए, ऐ	× ×	**कण्ठतालव्य** (कोण्ठोतालोव्वो-कण्ठयतालव्य)
ओ, औ	× ×	**कण्ठ्योष्ठ्य** (कोण्ठोउशठो-कण्ठ्यौष्ठ्य)
	अन्तस्थ व्	**दन्त्योष्ठ्य** (दोननोउशठो-दन्त्यौष्ठ्य)

ङ्, ञ्, ण्, न्, म् नां **'अनुनासिक वर्ण'** (आनुनाशिक बॉर्नो-अनुनासिक वर्ण) असे पण म्हणतात.

चंद्रबिंदु व ९ अनुस्वारांचा उच्चार नाकांतून होतो म्हणून त्यांना पण **'अनुनासिक वर्ण'** म्हणतात.

बाराखडी

मराठीप्रमाणेच बंगालीत 'অ' खेरीज सर्व स्वरांना वेगवेगळी चिन्हे आहेत—

আ (া), ই (ি), ঈ (ী), উ (ু), ঊ (ূ) ঋ (ৃ), এ (ে), ঐ (ৈ), ও (ো), ঔ (ৌ)

बंगाली ক কা কি কী কু কূ কৃ কে
मराठी क का कि की कु कू कृ के

बंगाली কৈ কো কৌ কং কঃ
मराठी कै को कौ कं कः

ह्याचप्रमाणे इतर बाराखड्या खालीलप्रमाणे काढता येतील.

ত তা তি তী তু তূ (তৃ) তে তৈ তো তৌ তং তঃ
ব বা বি বী বু বূ (বৃ) বে বৈ বো বৌ বং বঃ
ল লা লি লী লু লূ (লৃ) লে লৈ লো লৌ লং লঃ

टीप: व्यंजनवर्णांशी स्वरवर्ण जोडण्याला बंगालीत 'वानान' (वानान्) म्हणतात. कोणत्याही शब्दाचे 'वानान' सांगावयाचे म्हणजे तो शब्द कसा बनला आहे हे दाखवावे लागते.

उदा : यमुना = য্ + অ + ম্ + উ + ন্ + আ
कलिकाता = ক্ + অ + ল + ই + ক + আ + ত্ + আ

अभ्यास (३)

पुढील शब्द बंगाली लिपीत लिहा :-

रामायण, भरत, कैकेयी, हनुमान, रावण, बिभीषण, महाभारत, नकुल, सहदेव, बलराम, राधिका, केशव, गोपाल, नारायण, सोमनाथ, शैलजा, नटराज, मोहन, गजानन, शिवाजी, जिजाबाई, नानासाहेब, हेमलता, कुमुदिनी, रमेश, विजयकुमार, भगवानदास, आसाम, बिहार, हिमालय, मधुसूदन, सरोजिनी, राजशेखर.

पाठ २ रा : उच्चारण

উচ্চারণ

(उच्चारोन्)

प्रत्येक भाषेच्या उच्चारामध्ये स्वतःचे असे खास वैशिष्ट्य असते. बंगालीत तर ते विशेषच जाणवते. बंगाली भाषेत शब्द लिहावयाचा एका तऱ्हेने व त्याचा उच्चार करावयाचा दुसऱ्या तऱ्हेने असे द्वैत असल्यामुळे पुस्तकातील छापील वाक्य जरी आपणास समजले तरी तेच वाक्य एखाद्या बंगाली माणसाने उच्चारले तर आपणास समजत नाही. (विषयप्रवेश या सदराखाली दिलेल्या विश्वकवी रवींद्रनाथ ठाकुरांच्या कवितेच्या दोन कडव्यांवरून याची कल्पना आली असेलच.) केवळ उच्चारणाच्या नियमांचा अभ्यास करून शुद्ध उच्चार करता येणे अशक्य आहे. त्याकरिता बंगाली भाषा बोलणाऱ्या समाजातच वावरले पाहिजे. तरीसुद्धा पुस्तकाद्वारे उच्चार समजावणे जेवढे शक्य आहे, तेवढे समजाविण्याचा येथे प्रयत्न करण्यात आला आहे.

१

स्वर वर्ण (স্বরবর্ণ)

অ : (१) याचा स्वाभाविक उच्चार 'ऑ' असा करतात. [Doll मधील 'O' प्रमाणे]

उदा. অচল (ऑचॉल, ऑचल): কপাল (कॉपाल); দশ (दाश)

(२) 'অ' कारपुढील अक्षरामध्ये ই ঈ, উ, ঊ, য-फला, জ্ঞ, ক্ষ असेल तर त्याचा ह्रस्व 'ओ' सारखा उच्चार होतो. [Home मधील 'O' प्रमाणे]

उदा. অবধি (ओबोधि); করবী (कोरोबि); জলুশ (जोलुश्); বধূ (बोधु); পথ্য (पोतथो); দৈবজ্ঞ (दोइबोगनो); লক্ষ (लोक्खो)

(३) क्रियापदांच्या शेवटच्या 'অ' चा पुष्कळ वेळा 'ओ' असा उच्चार होतो.
उदा. করু (करो); করিল (करिलो); করিব (करिबो); করিত (करितो)

परंतु क्रियापदांच्या शेवटच्या 'ন' व 'ম' मधील 'অ' काराचा उच्चार होत नाही.

उदा. করেন (करेन); করিলাম (करिलाम्); করিবেন (करिबेन्); করিতাম (करिताम्)

(४) काही 'ণ' किंवा 'ন' कारान्त दोन अक्षरी शब्दांच्या पहिल्या अक्षराच्या अंती 'অ' असेल तर त्याचा 'अं' प्रमाणेच 'ओं' असा पण उच्चार होतो.

उदा. মন (मॉन ,मोन्); বন (बॉन , बोन); ধন (धॉन्, धोन); জন (जॉन , जोन) পণ (पॉन - प्रतिज्ञा या अर्थी: व पोन् -परिमाण व हुंडा या अर्थी)

परंतु पुढील शब्दात 'ओं' असाच उच्चार होतो.

রণ (रॉन्); গণ (गॉन्); সন (शॉन्)

(५) 'ই' कार किंवा 'এ' कारानंतर 'য়' अक्षर असेल तर त्यामधील 'অ' कारचा 'ओ' असा उच्चार होतो.

उदा. প্রিয় (प्रियो), (দয় (दियो), (ধয় (धेयो)

(६) शब्दाच्या सुरवातीला 'প্র' असल्यास त्यातील 'অ'चा उच्चार 'ओ' असा होतो. (প্র–প্রো)

उदा. প্রভাত (प्रोभात्); প্রণাম (प्रोनाम्); প্রবেশ (प्रोबेश्); প্রলয় (प्रोलोय्, प्रोलॉय)

(७) दोन अक्षरी शब्दाच्या शेवटी 'অ' कार असून त्या अगोदर ঋ, ঐ, ঔ असल्यास शेवटच्या 'অ' कारचा 'ओ' असा उच्चार होतो.
उदा. তৃণ (त्रिनो); শৈল (शोइलो); মৌন (मोउनो)

(८) शब्दाच्या शेवटच्या 'অ' काराचा कधी कधी उच्चार होत नाही.

उदा. কাঠ (काठ्); চিল (चिल); মানব (मानोब्); সলিল (शोलिल) या शब्दाबरोबर दुसरा बंगाली शब्द जोडल्याने सुध्दा त्यांच्या अंतिम 'অ' काराचा उच्चार होत नाही.

उदा. কাঠঠোকরা (काठ्ठोकरा) চিলগুলি (चिलगुलि) মানবসমাজ (मानोबशोमाज) মনগড়া (मोनगोड़ा) সলিলসমাধি (शोलिलशोमाधि)

परंतु जोडलेला शब्द जोडाक्षराने आरंभ होणारा असेल तर 'অ' काराचा उच्चार होतो. जोडलेला शब्द संस्कृत असेल तरसुद्धा कधी कधी 'অ'काराचा उच्चार होतो.

उदा नরলোক (नॉरॅलोक): ফলপ্রদ (फॉलोप्रोद)

(९) तीन अक्षरी शब्दाच्या अंतिम 'অ' काराचा उच्चार होत नसेल तेव्हा प्रायः मधल्या अक्षराच्या 'অ' काराचा 'ओ' असा उच्चार होतो.

उदा. তরল (तॉरोल); কথন (कॉथोन्); বমন (बोमोन); লবণ (लाबोन्)

परंतु अंतिम अक्षरात 'অ' काराव्यतिरिक्त इतर स्वर असल्यास 'অ'कार-युक्त मधल्या अक्षरातील অ चा उच्चार होत नाही.

उदा. চলতি (चोलति); শুকনা (शुक्ना); হলদে (होलदे); কায়দা (कायदा)

अपवाद : বাঁসরি (बाँशरि); জননী (जॉनोनि); জ্ঞাণদা (ग्यानोदा)

(१०) चार अक्षरी शब्दात दुसरे अक्षर 'অ' काराने युक्त असेल तर त्या 'অ' चा उच्चार होत नाही.

उदा. ছারপোকা (छारपोका); শয়তান (शयतान): কুলকুচা (कुलकुचा)

परंतु तत्सम शब्दामध्ये प्रायः दुसऱ्या 'অ' काराचा उच्चार होतो.

उदा. ভগবান (भॉगोबान्); মুখচন্দ্র (मुखचॉन्द्रो); দেবস্থান (देबोस्थान्)

चार अक्षरी शब्दाचे तिसरे अक्षर 'অ' कारयुक्त असेल तर स्पष्ट उच्चार होतो.

उदा. অভিমত (ओभिमॉतो, ओभिमॉत्); হরিতকী (होरितोकि) গনপতি (गानोपोति)

(११) चार अक्षरांहून मोठा शब्द असल्यास उच्चारण्याच्या सोयीसाठी त्याचे साधारणतः दोन दोन अक्षरी भाग पाडतात व त्या भागांच्या शेवटी 'অ' कार असेल तर त्याचा 'ओ' असा उच्चार होतो.

उदा. অনুধাবন (ओनु - धाबो - न) অনবরত (ओनो - बोरो - तो) সমীকরণ (शोमि - कोरो - न) ফরমাইশ (फोरो - माइ - श्)

(१२) शब्दाच्या शेवटी असलेल्या जोडाक्षरांतील व त्याच्या मागील 'অ' काराचा उच्चारणात लोप होत नाही व पुष्कळदा 'ओ' असा उच्चार होतो.

उदा. দণ্ড (डोन्डो, डोन्डॉ); পুষ্প (पुशपो, पुशपॉ); পরব্রহ্ম (पॉरोब्रोन्हो); সহস্র (शोहॉस्रो, शोहॉस्रो); অরবিন্দ (ओरोबिन्दो, ओरोबिन्दॉ)

(१३) शब्दाच्या शेवटी ট, ল, ক, য়, তর, তম, ত্ব, अस्त्यास अंतिम 'অ' काराचा 'ओ' असा उच्चार होतो व त्याच्या अगोदरच्या 'অ' काराचा पण उच्चार होतो.

उदा. গাঢ় (गाढो); দৃঢ় (ड्रिढो); (মাহ (मोहो); শক্ত (शोक्तो); বিধেয় (विधेयो); গুরুতর (गुरुतोरो); মৃদুতম (म्रिदुतोमो); ঈশ্বরত্ব (इशशोरोत्तो); মহত্ব (मोहोत्तो) परंतु বিষয় (बिशोय)

आशय (आशोय्) शब्दाच्या शेवटी 'ता' असल्यास त्याच्या अगोदरच्या 'अ' काराचा उच्चार होतो.

उदा. कृपणता (क्रिपोनोता); सरलता (शॉरोलोता).

(१४) संस्कृतमधून बदल न करता घेतलेल्या शब्दांतील (तत्सम शब्दांतील) अंतिम 'अ' काराचा उच्चार होत नाही.

उदा. गगन (गॉगोन). आकाश (आकाश), अपवाद :- जित (जितो), विविध (विविधो)

(१५) समासबद्ध शब्दांतील प्रत्येक 'अ' काराचा उच्चार होत नाही.

उदा. फलफुल (फॉल्फुल्); राजनीति (राज्नीति); गान-बाजना (गान्-बाज्ना); तरुन-तरुनी (तोरुन्-तोरुने).

(१६) अनुस्वाराच्या अगोदरच्या 'अ' काराचा 'ओ' असा उच्चार होतो.

उदा. अहंकार (ओहोंडकार); विसंगत (विशोङ्-गोतो).

(१७) विसर्गाच्या अगोदरच्या 'अ' चा 'ओ' असा उच्चार होतो व विसर्ग-पुढील अक्षराचे उच्चारण करताना द्वित्व होते.

उदा. अधःपात (ओधोप्पात्) मनःपूत (मोनोप् पुतो)

(१८) शब्दाच्या सुरवातीला नकारार्थी 'अ' किंवा 'अन्' तसेच सह किंवा संपूर्ण हया अर्थी 'स' किंवा 'सम्' हे उपसर्ग असतात तेव्हा 'अ' चा 'ऑ' असा उच्चार होतो.

उदा. अक्षम (ऑक्खोम्) अन्याय (ऑन्नाय्, ऑन्न्याय्); सांविनय (शॉंविनॉय); सम्प्रति (शॉम्प्रोति)

परंतु असे शब्द जर व्यक्तींची नावे असतील तर त्यांच्या आद्य 'अ' काराचा 'ओ' असा उच्चार होतो.

उदा. अतुल (ओतुल्); अमूल्य (ओमुल्लो); अविनाश (ओविनाश्).

(१९) शुद्ध बंगाली शब्दात पुष्कळवेळा अन्त्य 'অ' काराचा 'ओ' असा उच्चार होतो.

(क) विशेषण किंवा विशेषणाप्रमाणे वापरल्या जाणाऱ्या शब्दात :

उदा. ভাল (भालो); বড় (बॉड़ो); ছোট (छोटो); খাট (खाटो); এত (ॲतो); যত (जातो); কত (कॉतो); তত (तॉतो); হেন (हॅनो); যেন (जॅनो); কোন (कोनो); মত (मॉतो)

(ख) 'আন' प्रत्ययान्त शब्दात :

उदा. করান (कॉरानो); দেওয়ানো (देवानो); হাতড়ান (हात्डानो); পাড়ান (पाड़ानो).

(ग) द्विरुक्त विशेषणात व ध्वन्यात्मक शब्दात.

उदा. মর-মর (मॉरो-मॉरो); কাঁদ-কাঁদ (कांदो-कांदो); ঝর-ঝর (झॉरो-झॉरो); ছল-ছল (छॉलो-छॉलो)

(घ) काही संख्यावाचक विशेषणात :

उदा. এগার (एगारो); বার (बारो); তের (तेरो)

(ङ) 'ত' व 'ইত' प्रत्ययान्त विशेषणात :

उदा. পুলকিত (पुलोकितो); গত (गॉतो); নত (नॉतो); রক্ষিত (रोक्खितो)

আ (१) 'আ' चा साधारणतः ऱ्हस्व उच्चार होतो.

उदा. আপন (आपोन्); পাতা (पाता); কথা (कथा)

(२) विशेष जोर देण्याकरिता 'আ' चा दीर्घ उच्चार करतात (Calm मधील 'a' प्रमाणे)

उदा. হাত (हात); কাজ (काज्) ; আজ (आज्)

(३) 'না' मधील 'আ' काराचा नेहमी दीर्घ उच्चार होतो. परंतु क्रियापदाबरोबर आल्यास त्याच 'আ' काराचा ऱ्हस्व उच्चार होतो.

उदा. খাব না (खाबो ना)

(४) बंगालमधील काही प्रदेशांत शब्दारंभी असलेल्या 'অ'चे 'অ্যা' किंवा 'এ্যা' असे विकृत उच्चारण होते.

उदा. টাকা (टाका, ट्याका); বাঁকা (बांका, ब्यांका)

ই, ঈ :- (१) दोघांचा साधारणत: ह्रस्व उच्चार होतो. [Tin मधील 'i' प्रमाणे]

उदा. ইট (इट); দিবস (दिबोश); তিনি (तिनि); নদী (नोदि); দীপ (दिप); জীবনী (जिबोनि)

(२) कधी कधी दीर्घ उच्चार पण होतो. [Feet मधील 'ee' प्रमाणे]

उदा. দিন (दीन); অসীম (ओशीम):

(३) जोर देण्याकरिता किंवा वेगळा अर्थ दर्शविण्याकरिता दीर्घ उच्चार करतात.

उदा. তুমি কি স্বপ্ন দেখিতেছ ? (तुमि कि शॉपनो देखितेछो ? - तू कसले स्वप्न पहात आहेस ?) हा साधारण प्रश्न असून 'কি' वर जोर दिलेला नाही. परंतु তুমি কি স্বপ্ন দেখিতেছ ? (तुमि की शॉपनो देखितेछो ? तू काय स्वप्न पहात आहेस ?) हा जोर दिलेला प्रश्न आहे. त्यामुळे 'কি' चा दीर्घ उच्चार 'की' असा होतो. पुष्कळदा अशा ठिकाणी 'কি' बद्दल 'কী' लिहिण्याचा प्रघात आहे.

উ, ঊ :- (१) दोघांचा साधारणत: ह्रस्व उच्चार होतो. [Put मधील 'u' प्रमाणे.]

उदा. উচিত (उचित); উরু (उरु); তুষার (तुशार); দূর (दुर); তুন (तुन)

(२) कधी कधी दीर्घ उच्चार पण होतो. [Baloon मधील 'oo' प्रमाणे]

उदा. সুখ (शुख); অমুক (ओमुक); রূপ (रूप); परंतु রূপা (रुपा)

(३) दोन अक्षरी शब्दात 'উ' नंतर 'আ' किंवा उच्चारित 'অ' असेल तर 'উ' चा 'ओ' उच्चार करतात.

उदा. উঠ (ओठो); উড়া (ओड़ा)

ঋ :- साधारणतः 'रि' उच्चार होतो.

ঋজু (रिजु); ঋতু (रितु); কৃপন (क्रिपोन्); নৃপ (न्रिपो); परंतु ঋন (रीन्)

['ঋ' व 'রি' (র্+ই) ह्यांचा उच्चार एकच असल्यामुळे 'ঋ' ला वेगळा स्वरध्वनि नाही. म्हणून संस्कृतभरीज बंगाली व विदेशी शब्द लिहिताना 'ঋ' चा वापर न करण्याचा प्रघात आहे.

उदा. संस्कृत शब्द :- संस्कृति (সংস্কৃতি); अमृत (অমৃত)
बंगाली व विदेशी शब्द :- ख्रिस्त (খ্রীষ্ট); ख्रिश्चन (খ্রীষ্টান); ब्रिटिश (ব্রিটিশ)]

৯ :- ह्या अक्षराचा स्वर म्हणून बंगालीत उपयोग होत नसल्यामुळे त्याचा उच्चार पण नाही.

এ :- (१) शब्दाच्या मध्ये किंवा शेवटी 'এ' कार असल्यास त्याचा 'ए' असा उच्चार होतो. [Set मधील 'e' प्रमाणे]

उदा. ছেলে (छेले); মেয়ে (मेये); নেয়ে (नेये-नेए); চামচিকে (चामचिके)

(२) एकाक्षरी सर्वनामाच्या 'এ' कारचा ए असा उच्चार होतो.

उदा. সে (शे); কে (के); যে (जे); এ (ए)

(३) 'এ' कारच्या पुढले अक्षर অ, ই, ঈ, উ, ঊ वगळून वा 'हसन्त' असल्यास त्या 'এ' कारचा (ए) असा उच्चार होतो.

उदा. দেহ (देहो, देहा); কেলি (केलि); বেটী (बेटि); সেতু (शेतु); কেয়ূর (केयुर्-केउर); এন্তার (एन्तार); একটি (एकटि); একটু (एकटु)

अपवाद :- কমন (कॅमोन्, क्यामोन्); কেন (केंनो, क्यानो); এক (अॅक); একটা (अॅक्टा); একদা (अॅकोदा); যেন (जेंनो); গেল (गेलो)

(४) शब्दाच्या सुरवातीला अमलेल्या 'এ' कारापुढे येणाऱ्या अक्षरांत 'আ' कार, (क्वचित्) 'এ' कार व 'ও' कार असल्यास किंवा 'এ' कारावर चंद्रबिंदु असल्यास 'এ' काराचा 'এ্যা' किंवा 'অ্যা' असा विकृत् उच्चर होतो. अशा उच्चाराला 'বাঁকা একার' (बांका एकार-वक्र एकार) म्हणतात.

उदा. (ভলা (भॅला, भ्याला); (বচা (बॅचा, ब्याचा); একা (अॅका); (দেখা (दॅखा, द्याखा): (খলা (खॅला, ख्याला); (শওলা (श्याओला); (পঁচা (प्यांचा); (ছঁদা (छ्यांदा)

[(দেখে (दॅखे, द्याखे); (খলে (खॅले, ख्याले) ही जेव्हा '(দেখা' व '(খলা' हया क्रियापदांची वर्तमानकाळची तृतीय पुरुषाची रूपे असतात तेव्हा त्यांचा कंसांत दाखविल्याप्रमाणे उच्चार करतात. परंतु जेव्हां ही '(দেখিয়া' व '(খলিয়া' हया असमापिका क्रियापदांची चलित भाषेतील रूपे असतात तेव्हा त्यांचा उच्चार 'देखे' व 'खेले' असा करतात. इतर 'এ' काराने सुरू होणाऱ्या क्रियापदाना पण हाच नियम लागतो.]

(५) उदा. कधीकधी एकाच वेळी 'ए' व 'अॅ' असे दोन्ही उच्चार होतात.

(आँ) काही अव्ययांचा वाक्यात नीट अर्थ होत नाही परंतु त्यामुळे वाक्याची शोभा वाढते व काही वेळा वाक्याचा अर्थ विशेष स्पष्ट होतो. अशा अव्ययाना 'বাক্যালঙ্কার অব্যয়' (वाक्यालंकार अव्यये) म्हणतात.

ত, তা, বা, মনে, যে, সেই, না, নাকি, বুঝি, গে, বৈকি, इत्यादि.

ত – আমি ত কিছুই বুঝি নাই। मला तर काहीच समजले नाही.

তা – তা তুমি এলে কখন ? तर मग तू आलास केव्हा ?

না – যাক না। করুক না। जाऊंद्या ना. करू द्या ना.

বা – নাই বা গেলে। गेला नाहीस तर.

বুঝি – আমি বুঝি কেউ নই ? मी कोणीच नाही वाटते ?

মেনে – "যদি গৌর না হইত কি মেনে হইত ?"
जर गौर (महाप्रभू चैतन्य) झाले नसते तर काय झाले असते ?

যে – বাস এল যে ! बस आली की !

সেই – "পতি হবে সেই সে তাহার।" अखेर तो तिचा पति होईल

গে – যাকগে। जाऊ द्या. मरूक गे। मरू द्या.

বৈ কি – আসবে ত ? आसव वै कि। येणार ना ? हो, येईन तर.

নাকি – তুমি নাকি রাগ করেছিলে !
तू किनई रागावला होतास ! किंवा तू रागावला होतास ना ?

△ △ △

४

अव्ययांचा अनेकार्थी वापर

१) ও

('व', 'आणि' ह्या अर्थी दोन शब्द जोडण्यास उपयोग करतात. सुद्धा ह्या अर्थी हे अव्यय शब्दाला जोडून येते.)

তাঁহার সুখ ও দুঃখ দুইটাই সমান।
त्याना सुख व दुःख दोन्हीही सारखीच आहेत.

বইটার নাম ও শুনি নাই। पुस्तकाचे नावसुद्धा मी ऐकलेल नाही

সে এবারেও উত্তীর্ণ হইবে না। तो यावेळेलाही पास होणार नाही.

সে নিরেট মূর্খ হইতে পারে, কিন্তু তুমিও যেমন।
तो अगदी मूर्ख असू शकेल, परंतु तू तरी काय आहेस ? (तू सुद्धा त्याच्या-सारखाच आहेस हचा अर्थी)

আমি গেলে ও যাইতে পারি। मी गेलो तर जाईन

তোমার আসাও যা, যাওয়াও তাই।
तुझे येणे व जाणे ही दोन्हीही सारखीच आहेत.

তুমি করিব বলিয়াও কর নাই।
तू करीन म्हणून कबुल करनसुद्धा केल नाहीस

তোমাকে কৃপণ বললেও হয়।
तुला चिक्कू म्हटले तरी चालेल. (म्हणणे योग्य ठरेल)

আমি তাহার কথাটা শুনিয়াও শুনি নাই।
मी त्याचे बोलणे नीट ऐकले नाही. (ऐकले न ऐकल्यासारखे केले)

আমিও এখন কাজ করিব। मीसुद्धा आता काम करीन.

আমি এখনও কাজ করিব।
मी आतासुद्धा (किंवा अजुनही) काम करीन.

['ও' चा सर्वनाम, विशेषण किंवा संबोधनसूचक (विस्मयसूचक इत्यादि) अव्यय म्हणूनही वापर होतो.

उदा. ও কিছুই করতে পারবে না। तो काहीही करू शकणार नाही (सर्वनाम)

ও লোকটা বড় দুষ্ট। तो मनुष्य फार दुष्ट आहे (विशेषण)

ও মাসে সে হাসপাতালে ছিল।
गेल्या महिन्यात तो इस्पितळात होता. (विशेषण)

"ও পারেতে সর্বসুখ আমার বিশ্বাস।" –রবীন্দ্রনাথ
त्या पलिकडच्या किनाऱ्यावर सर्व सुख आहे अशी मला खात्री आहे (विशेषण)

ও শ্যাম! তুই যাচ্ছিস কোথায়?
अरे श्याम! तू कुठे जात आहेस. (संबोधनसूचक अव्यय.)

ও, তাই নাকি! हा, अस्सं काय! (विस्मयसूचक अव्यय)

ও, মনে পড়েছে সেই কথা। हा आता ती गोष्ट आठवली. (स्मरणसूचक अव्यय)

'এবং' चा उपयोग 'व', 'आणि' ह्या अर्थी दोन वाक्यांश किंवा वाक्ये जोडण्याकरिता करतात.

তিনি স্নান করিয়া এবং ফলাহার করিয়া আপিসে গেলেন।
ते स्नान करून व फलाहार करून ऑफिसला गेले.

সে পরীক্ষায় উত্তীর্ণ হইল এবং ছাত্রবৃত্তিও পাইল।
तो परीक्षेत पास झाला व त्याला शिष्यवृत्तिही मिळाली.]

২) আর

('व', 'आणि' ह्या अर्थी दोन शब्द जोडण्याकरिता 'আর' चा उपयोग करतात.)

সতীশ আর গিরীশ সার্কাস দেখিতে যাইবে।
सतीश व गिरीश सर्कस पहायला जातील.

তুমি আর আমি কি করিতে পারি?
तू व मी काय करू शकतो?

অনেক লিখিয়াছি আর কিছুই লিখিব না।
(आतापर्यंत) पुष्कळ लिहिले आहे, यापुढे काहीही लिहिणार नाही.

আর ওর বাড়ী যাওয়া উচিত নয়।
पुन्हा त्याच्या घरी जाणे योग्य नाही.

আমি কাজ করিব আর না করিব, তোমার কি?
मी काम करीन किंवा करणार नाही, तुझे काय जाते?

সে তোমাকে ভালবাসে আর তুমি তাহাকে গালাগালি দাও।
तो तुझ्यावर प्रेम करतो, परतु तू त्याला शिव्या देतोस.

যা হবার হ'য়ে গেছে, সে কথা আর কেন?
जे व्हायचे ते होऊन गेले, आता ती गोष्ट कशाला?

আর সে দিন আসিবে না।
आता (किंवा यापुढे) तो दिवस येणार नाही. (किंवा ते दिवस येणार नाहीत.)

এমন অপরূপ সৌন্দর্য আর কোথাও দেখিনি।
असे अप्रतिम सौंदर्य पूर्वी कुठेच पाहिले नव्हते.

তা আর বলতে?
ते काय सागायला पाहिजे?

আর একদিন তুমি আমার বাড়ীতে এস।
पुन्हा कधीतरी (एके दिवशी) तू माझ्या घरी ये.

সে আর এখানে আসে না।
तो इथे येत नाही.

চোখে দেখা আর কানে শোনা, দুটোর মধ্যে অনেক তফাৎ।
डोळ्यानी पाहणे आणि कानानी ऐकणे ह्या दोघात फार फरक आहे.

সে দিন একখানি হাজার টাকার নোট পুড়িয়েছিলাম আর কি।
मी त्या दिवशी हजार रुपयाची एक नोट जवळ जवळ जाळलीच होती कि.

আমি আর অপেক্ষা করিতে পারি না।
मी आणखी वाट पाहू शकत नाही.

পাগল আর কি!
किती वेडा आहेस तू! (किंवा) वेडा कि काय?

তার আর কথা আছে?
त्याने काहीही बोलण्याची आवश्यकता नाही किंवा त्याच्याविषयी काय सागायला पाहिजे?

তুমি যাহা বলিলে তাহা আর আমি শুনি নাই।
तू जे बोललास ते (काहीही) मी ऐकले नाही.

"টাকা কি আর অমনি আসে?"
पैसा काय असाच येतो?

আর যদি বিপদই হয়, আমাকে তার কর।
संकट आलेच तर मला तार कर.

"ধানগাছে কি আর তক্তা হয়?"
गवतापासून काय फळी होते?

['আর' चा विशेषण म्हणूनही वापर होतो.

আমি ছাড়া আর কেহ ইহা জানে না।
माझ्याशिवाय हे कोणालाही ठाऊक नाही.

আর এমন জিনিষ পাওয়া যাবে না।
ह्यासारखी दुसरी वस्तु मिळणार नाही.

আর বছর আমার ভয়ানক গেছে।
गेले वर्ष मला फार वाईट गेले.

আর রবিবারের মধ্যে কাজ শেষ করিতে হইবে।
येत्या रविवारच्या आत काम संपविले पाहिजे.]

৩) আবার

তুমি আবার তাঁহার কাছে যাও।
तू पुन्हा त्यांच्याजवळ जा.

বজ্র হইতে কঠোর আবার ফুল হইতে নরম।
वज्रापेक्षा कठीण तरीसुद्धा फुलापेक्षा नरम.

যে তোমার সঙ্গে সর্বদা ঝগড়া করে তাহাকে আবার সাহায্য করবে?
जो तुझ्याबरोबर नेहमी भांडतो, त्याला तू मदत करणार?

অনেকে তাঁহাকে মানে, আবার অনেকে তাঁহাকে গালি দেয়।
पुष्कळ लोक त्याना मानतात, तर पुष्कळ लोक त्याना शिव्या देतात.

সে, আবার টাকা খরচ করবে ?
तो, आणि पैसे खर्च करणार ?

আমি তাহাকে আমার বাড়ীতে রেখেছি। কি আবার করব ?
मी त्याला माझ्या घरी ठेवले आहे. आणखी मी काय करणार ?

মাথা ব্যথা আবার পেটের অসুখ হওয়ায় তিনি কৃশ হইয়াছেন।
(आधीच) डोकेदुखी, आणि त्यात पुन्हा पोटात बिघाड झाल्यामुळे ते कृश झाले आहेत.

৪) বরং, বরঞ্চ

এই অপমান সহ্য করা অপেক্ষা বরং চাকরি ছেড়ে দেওয়াই ভাল।
हा अपमान सहन करण्यापेक्षा नोकरी सोडणेच (अधिक) चागले.

তাহাকে কেহ ভাল বাসে না বরং সকলে ঘৃণা করে।
त्याच्यावर कोणीच प्रेम करीत नाही उलट सगळे त्याचा निरस्कार करतात.

তুমি বরং ডাক্তার ডাক।
तू डॉक्टरना बोलाव. (तू डॉक्टरना बोलावणे योग्य होय ह्या अर्थी.)

তার চেয়ে এটা বরং ভাল।
त्यापेक्षा हे काहीसे चागले आहे.

বরং না খাইয়া মরিব তথাপি কাহারও সম্মুখে হাত পাতিব না।
मी न खाता मरेन, परंतु कोणाही पुढे हात पसरणार नाही.

আমি মারি নাই বরঞ্চ সেই মারিয়াছে।
मी मारले नाही, उलट त्यानेच मारले.

৫) কি

তুমি কি যাবে ?
तू जाणार काय ?

কি বালক কি ধণী সকলেই নাচিতে লাগিল।
मुले काय किवा म्हातारे काय सर्वचजण नाचायला लागले.

['কি' चा सर्वनाम, विशेषण किंवा क्रियाविशेषण म्हणूनही वापर होतो.

उदा. "সমুদ্র তরঙ্গবাহু তুলি কি কহিছে স্বর্গ জানে।" -রবীন্দ্রনাথ
समुद्र लाटारुपी हात उचलून काय सागत आहे ते स्वर्ग जाणतो. (सर्वनाम)

"কি আর বলিব আমি?" -চণ্ডীদাস
मी आणखी काय सागू? (सर्वनाम)

কি ক'রে এই বইটা তুমি পেলে?
हे पुस्तक तुला कसे मिळाले? (क्रियाविशेषण)

কি আনন্দ! নাচছ যে।
नाचत आहेस तो! केवढा आनंद झाला आहे तुला?

['কি' शब्दावर विशेष जोर दर्शविण्याकरितां 'কী'चापरतात.

उदा. তোমার কী হয়েছে?
तुला काय झाले आहे?]

৬) যে

কি যে হবে কে জানে?
काय होणार कुणास ठाऊक?

সে বলিল যে বৃষ্টি হইবে না।
तो म्हणाला कि पाऊस पडणार नाही.

সে যে কাজ করবে না তা জানি।
तो काम करणार नाहीं हे मी जाणतों.

তুমি যে আনতে বললে তাই এনেছি।
तू आणायला सांगितलेस म्हणून मी आणलें

তুমি কিছুই খেলে না যে?
तू काहीच खाल्ले नाहीस?

ঐ যে বাস আসছে।
ती (पहा) बस येत आहे.

['যে' चा सर्वनाम किंवा विशेषण म्हणूनही चापर होतो.

उदा. যে যেতে চায় তাকে যেতে দাও।
ज्याला जायच असेल त्याला जाऊ द्या. (सर्वनाम)

আমাদের গ্রামের যে সে (বা যে কেহ) এ কথা জানে।
आमच्या गावातील प्रत्येकाला ही गोष्ट ठाऊक आहे. (सर्वनाम)

যে লোকটা তোমায় ঠকিয়েছে, সে এখন ধরা পড়েছে।
ज्या माणसाने तुम्हाला फसविले तो आता पकडला गेला आहे. (विशेषण)]

৭) তো (ত), তা, তাই, তাইত, তাইতে

কেমন আছেন? ভাল তো?
कसं काय? बरं आहे ना?

এতদিন খেটেছি কিন্তু কিছুই তো হ'ল না।
इतके दिवस मी मेहनत केली परंतु काहीच झाले नाही.

ডাক্তারবাবু, রোগীকে একবার দেখুন তো।
डॉक्टरसाहेब रोग्याला एकदा तपासा ना.

তুমি বাড়ী যাবে তো?
तू घरी जाणार ना?

তুমি তো আর কচি খুকি নও?
तू तर आता कोवळी मुलगी नाहीस?

তুমি তো দিলে, কিন্তু আমি তাহা নিতে পারি না।
जरी तू दिलंस तरी मी ते घेऊ शकत नाही.

তুমি যদি ওকে বলতে চাও বল, সে তো তোমার কিছুই শুনবে না।
तुला जर त्याला सांगायच असेल तर सांग, परंतु तो तुझे काहीही ऐकणार नाही.

বাঁচতে চাও তো ডাক্তার ডাক।
जगायचे असेल तर डॉक्टरांना बोलव.

আজ তো আমি কোথাও যাইব না
आज तरी मी कुठेही जाणार नाही.

তিনি তো এরূপ বলেন নাই?
तें तर असें म्हणालें नाहीत ना?

সেই তো রমেশচন্দ্রের মেয়ে।
तीच तर रमेशचंद्राची मुलगी.

যাও তো ভালই।
गेलास तर बरे होईल.

সে তো সেদিনকার ছেলে।
तो तर कालचा पोर आहे.

সে যে প্রথম শ্রেণীতে পাশ করবে তার ত কথা নাই।
तो प्रथम श्रेणीत पास होईल, ह्यात मुळीच शंका नाही.

তা তুমি এলে কখন?
(बर मग) तू आलास केव्हा?

রোজই তোমার ওখানে যাব যাব ভাবি তা আর সময় হয়ে ওঠে না।
रोजच मी तुझ्याकडे येईन असे म्हणतो परंतु यावयास वेळ मिळत नाही

তা তোমার কি কথা শুনি।
ठिक आहे (किंवा जाऊ द्या), तुझे काय म्हणणे आहे ते मला ऐकू द्या.

['তা' হে 'তাহা' ह्या सर्वनामाचे 'চলিত' रूपही आहे.

उदा. তা আর বলতে? ते काय सांगायला पाहिजे?]

সে কিছুই জানেনা তাই চুপ ক'রে থাকে।
त्याला काहीही माहित नाही म्हणून तो गप्प बसतो

তুমি বড়ই অজ্ঞান; তাইত এমন কথা বল।
तू अगदीच अडाणी आहेस, म्हणूनच असे बोलतोस.

তাইত, ঠিক কথাই বলেছ।
बरोबर आहे, तू योग्य तेच बोललास.

তাইত, এখন কি করা যায়?
मग आता काय करावे?

বাবার অসুখ করেছিল তাইতে আমি আসতে পারিনি।
वडिल आजारी होते म्हणून मी येऊ शकलो नाही.

তাকে আসতে বলেছিলাম তাইতে সে একথা বললে।
त्याला मी यावयास सांगितले होते. त्याला त्याने हे उत्तर दिले.

সে তোমাকে হয়ত কিছু বলেছে, তা ব'লে কি তুমি ওকে মারবে।
त्या तुला काही म्हणाला असेल म्हणून तू त्याला मारणार कि काय?

তা ব'লে হে 'তাই বলিয়া'র 'চলিত' রূপ আছে।]
'তাই' हे 'তাহাই' चे 'চলিত' रूप असल्यामुळे त्याचा सर्वनामाप्रमाणे पण वापर होतो.

তবে তুমি যা বলেছ তাই করেছি। त्या जे सांगितलेस तेच मी केले आहे.]

৮) বটে

তাই ঠিক বটে, আমার ভুল হয়েছে।
(तुम्ही म्हणता) ते बरोबर आहे, माझी चूक झाली आहे

বটে! রঘুনাথ বিলাত গেছে?
रघुनाथ विलायतेला गेला आहे हे खरे आहे काय?

তিনি ধনী লোক বটে, কিন্তু তাতে আমার কি?
ते श्रीमंत आहेत हे खरे आहे परंतु त्याचा मला काय फायदा?

বীর বটে! সেনাকে দেখেই পালিয়ে এল।
वीर (आहे) खरा! रणांगण पाहताच पळून आला.

বটে, এখন বুঝেছি তার মনে কি ছিল।
हां, आता समजले त्याच्या मनात काय होते ते.

৯) বই, বৈ, বৈ কি,

তিনি দুধ বই আর কিছুই খান না।
ते दुधाखेरीज आणखी काही घेत नाहीत.

তুমি একজন সামান্য কেরানী বৈ ত নয়।
तू केवळ एक सामान्य कारकून आहेस. (सामान्य कारकुनापेक्षा तू श्रेष्ठ आणखी काही नाही)

এটা তাহার চালাকি বই ত নয়।
ही केवळ त्याची चलाखी आहे (आणखी काही नाही)

গ্রামে একটি বই ভাল কবিরাজ নাই।
गावात केवळ एकच चांगला वैद्य आहे (शब्दशः गावात एकापेक्षा दुसरा चांगला वैद्य नाही.)

আসবে ত? আসব বৈ কি।
येणार ना? हो, येईन तर.

কত? দশ টাকা লাগবে? তা বৈ আর কি?
किती? दहा रुपये लागतील? होय त्यापेक्षा आणखी काय लागणार?

তোমার সঙ্গে দেখা করব বই কি?
होय, मी तुला नक्कीच भेटेन.

"মা তোমা বই আর কেউ নাই।" রামকৃষ্ণ পরমহংস
आई! तुझ्याशिवाय मला दुसरा कोणी नाही.

১০) বা

আমরা যা করি বা যা বলি তা তুমি ত জান।
आम्ही जे करतो किंवा जे बोलतो ते तुला तर ठाऊक आहे

রাম বা ঐ কথা বলেছে।
कदाचित् रामनें ती गोष्ट सांगितली असेल.

তোমারই বা যাইবার আবশ্যকতা কি?
तुझ्याच जाण्याची काय आवश्यकता आहे?

নাই বা গেলে?
(समक्षा) नाही गेलास तर?

বাংলা বই পড়বেই বা কে? এখানে ত কেউ বাংলা জানে না।
बंगाली पुस्तके कोण वाचील? इथे तर कोणालाच बंगाली येत नाही.

কেউ বা খায়, কেউ বা গায়, কেউ বা নাচে, কেউ বা পড়ে, কেউ বা ঘুমায়।
कोणी खातात, कोणी गातात, कोणी नाचतात, कोणी वाचतात तर कोणी झोपतात.

ইহা শুনিয়া তাহার বড় রাগ হইবে, হইলেই বা।
हे ऐकून त्याला फार राग येईल, येऊ द्या.

বলই বা কি আর করই বা কি ?
बोलतोस काय आणि करतोस काय ?

রাম বা মন্দ কিসে, শ্যাম বা ভাল কিসে ?
राम कोणत्या बाबतीत वाईट आहे आणि श्याम कोणत्या बाबतीत बरा आहे.

আমিই বা তোমার সঙ্গে আসব কেন ?
मी तरी तुझ्याबरोबर का यावे ?

বা ! তুমি এখনও যাও নাই ?
काय! तू अजूनही गेला नाहीस ?

বা ! অবিনাশ বা ! তুমিই ইস্কুলের নাম রাখলে।
शाबास! अविनाश शाबास! तूच शाळेच नाव राखलस.

১১) ই

তুমিই ত তাহাকে বলিয়াছিলে।
तूच तर त्याला सांगितले होतेस.

তিনিই আমার মামা।
तेच माझे मामा.

আমি ত তাহাই চাই।
मला तर तेच पाहिजे.

তিনটি ছেলেই পরীক্ষায় অনুত্তীর্ণ হইয়াছে।
तीनही मुलगे परीक्षेत नापास झाले.

ভোজন করিয়াই বাড়ী যাইব।
जेवलो कि लगेच घरी जाऊं.

আমিই তাহাকে খাতা দিয়াছি।
मीच त्याला वही दिली.

আমি তাহাকেই খাতা দিয়াছি।
मी त्यालाच वही दिली.

আমি তাহাকে (কেবল) খাতাই দিয়াছি।
मी त्याला (फक्त) वहीच दिली

তিনি আসিলেই সকলে কাজ করিতে লাগিল।
ते येताच सर्वजण काम करू लागले

তুমি তাঁহার সামনে দাঁড়াতেই পারবে না।
तू त्याच्यासमोर उभाच राहू शकणार नाहीस. (त्यांच्याशी तुझी तुलनाच होऊ शकणार नाही. हचा अर्थी)

কাল তোমাকে আসিতেই হইবে।
उद्या तुम्हाला यावेच लागेल.

আমার এই কাজ কাল শেষ হবেই হবে।
माझे हे काम उद्या खात्रीने पूर्ण होईल. (शब्दशः होईलच होईल)

সে ত আমাদের নিন্দা করবেই।
तो तर आमची निंदा करीलच.

কিছুতেই কিছু হ'ল না।
कशाचाच काही उपयोग झाला नाही.

সে ত আমার বাড়ীতে আসেই না।
तो तर माझ्या घरी येतच नाही.

তুমি আমার খাতাটা নিলেই নিতে পারতে।
तू माझी वही अवश्य घेऊ शकतोस.

তুমি সেখানে গেলেই পার, কে তোমাকে ধরে রেখেছে।
तुला जायच असेल तर तू जा. तुला कोणी अडवलं आहे ?

বললেই হ'ল ? কিছু করতে হয় না বুঝি ?
बोलणं कि झाल ? काही कराव लागत नाही वाटत ?

তার মাকে ঘরের লক্ষী বললেই হয়।
त्याच्या आईला (त्याच्या) घराची लक्ष्मी म्हटले तरी चालेल.

মা সুখী হ'লেই হ'ল।
आई सुखी असली म्हणजे झाल.

কেউ কিছু বলুক না কেন, কাহাকেই বা মানি ?
कोणी काही म्हणेना का, मी कोणाची पर्वा करतो आहे ?

যদি বাজারে যাই, তোর জন্য কিছু না কিছু আনবই।
जर बाजारात गेलोच तर तुझ्याकरिता काही ना काही आणीन.

নিজের উন্নতিই যদি তোমরা চাও, তাহা হইলে একমাত্র অধ্যবসায় ছাড়া অন্য কোন উপায় নাই।
स्वतःच्या उन्नतिचीच जर तुमची इच्छा असेल, तर चिकाटीखेरीज दुसरा कोणताही उपाय नाही.

"যতই করিবে দান ততই বাড়িবে মান।"
जितके (जास्त) तुम्ही दान कराल तितका (जास्त) तुमचा मान वाढेल

কেনই বা আমি চির-পবিত্র রঘুবংশে জন্মগ্রহণ করিয়াছিলাম?"
कशाला मी (हवा) चिर-पवित्र रघुवंशात जन्म घेतला?

১২) হয়ত, বোধ হয়, বুঝি

হয়ত–कदाचित, बोध हय–असे मला वाटते, বুঝি–असे मला वाटते.

হয়ত তুমি মনে করেছিলে আমি আসব না।
कदाचित मी येणार नाही असा तू विचार केला असशील.

হয়ত তাহার টাকা শেষ হ'য়ে গেছে।
कदाचित त्याचे पैसे संपले असतील.

আমার হয়ত আজ জ্বর হবে।
मला कदाचित आज ताप येईल (किंवा मला आज ताप येईल असे वाटते.

আজ বোধ হয় তাঁহার আসা হইবে না।
आज त्याचे येणे होणार नाही असे मला वाटते.

বোধ হয় তিনি কিছুই জানেন না।
त्याना काहीच ठाऊक नाही असे मला वाटते.

আশার বয়স বুঝি দুই বৎসর।
आशाचे वय दोन वर्षे आहे असे मला वाटते.

কাল থেকে বুঝি তোমাদের কলেজ বন্ধ হবে।
उद्यापासून तुमचे कॉलेज बंद होईल असे मला वाटते

সে বুঝি নিজের পকেট থেকে খরচ করে।
तो स्वतःच्या खिशातून खर्च करतो असे मला वाटते.

['বোধ হয়' या शब्दात 'বোধ' हे नाम व 'হয়' हे क्रियापद असले तरी त्या दोन्ही शब्दांचा अव्ययाप्रमाणे वापर होतो तसेच 'বুঝি' हे

বোঝা (বুঝ্) चे वर्तमानकाळी 'উত্তম পুরুষ' चे रूप असले तरी त्याचाही अव्ययाप्रमाणे वापर होतो.]

১৩) মাত্র

নাম মাত্র রাজা।
नामधारी राजा

আমি ক্ষণমাত্র সেখানে দাঁড়াব।
मी क्षणभरच तिथे उभा राहीन

মাত্র এইটুকু দুধ তুমি আমায় দিলে?
केवळ एवढसंच दूध तू मला दिलंस?

তিনি সবেমাত্র রুশিয়া গেছেন।
ते नुकतेच रशियाला गेले आहेत.

তিনি আসিবামাত্র সকলে চুপ করিল।
ते येताच सर्वजण गप्प बसले.

মনুষ্যমাত্রেরই ভুল হয়।
प्रत्येक माणसाकडून चूक (ही) होतेच.

মাত্র আমি এই কাজ করিয়াছি।
मीच हे काम केले आहे.

আমি এই কাজ মাত্র করিয়াছি।
मी (केवळ) हेच काम केले आहे.

আমি কথা বলিয়াছি মাত্র।
मी फक्त असे म्हटले आहे.

(परंतु म्हणण्याप्रमाणे काहीही केले नाही.)

১৪) বলিয়া, ব'লে

জায়গাটা দূর বলিয়া আমি সেখানে যাই নাই।
(ती) जागा लांब असल्यामुळे मी तिकडे गेलो नाही

মৃত বলিয়া সকলে তাহাকে পুড়িয়া ফেলিল।
मेली असे समजून तिला सर्वांनी जाळून टाकले.

তিনি এই বলিয়া শপথ করিয়াছেন।
त्यानी अशी शपथ घेतली आहे.

আমি তাহাকে বিদ্বান্ বলিয়া জানিতাম।
मी त्याला विद्वान समजत होतो.

তুমি কি বলিয়া গেলাসটি ভাঙ্গিলে?
तू हे ग्लास का फोडलेस?

সে আসব ব'লে এল না।
तो येईन असे कबूल करुनसुध्दा आला नाही.

সে দুর্বল বটে, কিন্তু তা ব'লে তুমি কি তাকে ঘৃণা করবে?
तो अशक्त आहे हे खरे आहे, पण म्हणून काय तू त्याचा तिरस्कार करणार?

বৃষ্টি হইল বলিয়া আসিতে পারিলাম না।
पाऊस पडला म्हणून मी येऊ शकलो नाही.

সে ইহা নাষ্য বলিয়া মনে করে।
हे योग्य आहे असे तो समजतो.

['বলিয়া' হে বলা (বল্) চ্যা অসমাপিকা ক্রियेचेही रूप आहे.

এই বলিয়া সে চলিয়া গেল।
असे सांगून तो निघून गेला.

তুমি আমাকে না ব'লে গেলে কেন?
तू मला न सांगता का गेलास?]

১৫) যেন

(१) जसे काही, जणू काही या अर्थी

তিনি যেন আমার বাবার মত।
ते मला अगदी वडलासारखे आहेत.

তুমি যেন ইহার কিছুই জান না।
तुला जणू काही यातले काहीच माहीत नाही.

আমি যেন আমাতে নাই।
मी जणा काही स्वत:मध्ये नाही. (इतका मी स्वत:ला विसरलो आहे
I am not myself)

তুমি যেন একজন বিদূষক।
तू जसा काही एक विदूषकच आहेस.

(২) কল্পনা করা, समजा या अर्थी.

এটা যেন চন্দ্র, আর এটি পৃথিবী।
समजा, हा चंद्र आहे व ही पृथ्वी आहे.

আমি যেন এটা করিলাম –ইহাতে তোমার ক্ষতি কি?
समजा मी असे केल त्यात तुझे काय नुकसान आहे?

আমার কথা যেন মিথ্যা তোমার কথা ত সত্য?
समजा माझे बोलणे खोटे आहे, तुझे बोलणे तर खरे आहे?

(৩) असे दिसते, असे वाटते ह्या अर्थी

আপনাকে যেন কোথায় দেখেছি।
आपणाला कुठे तरी पाहिले आहे असे वाटते.

আজ যেন বৃষ্টি হইবে।
आज पाऊस पडेल असे दिसते.

(৪) इषारा देण्याच्या वेळी.

দেখ, আবার যেন এই রকম না হয়।
पहा, पुन्हा असे होता कामा नये.

তুমি যেন শেষে বলিও না, আমি কিছুই জানতাম না।
मला काहीही माहीत नव्हते असे तू शेवटी बोलू नकोस.

(৫) प्रार्थना, इच्छा व्यक्त करताना

ঈশ্বর যেন আপনাকে দীর্ঘজীবী করেন।
परमेश्वर आपणाला दीर्घायुषी करो.

আপনি যেন বিজয়ী হ'ন।
आपण विजयी व्हावे.

(६) तुलनेच्या वेळी

सुन्दर येन कन्दर्प ।
मदनाप्रमाणे सुदर.

नील येन आकाश ।
आकाशाप्रमाणे निळे.

(७) ज्यामुळे ह्या अर्थी.

एमन साजा दाओ येन से आबार चुरि ना करे ।
(ज्यामुळे) तो पुन्हा चोरी करणार नाही अशी त्याला शिक्षा कर

तिनि एमन भावे अनुरोध करियाछेन, येन आमि काल आसि ।
त्यानी अशारितीने मला विनती केली आहे की, ज्यामुळे मी उद्या (त्यांच्याकडे) जावे.

(८) संभव असणे ह्या अर्थी

ए येन बाहिरेर लोक, ग्रामेर सबन्धे किछुई जाने ना, किन्तु तुमि त सब जान ?
हा बाहेरचा मनुष्य असेल, त्याला गावासबधी काहीही माहीती नसण्याचा संभव आहे परंतु तुला तर सर्व माहीत आहे.

(१७) ना (पूर्ण वर्तमान व पूर्णभूत ह्याखेरीज सर्व नकारार्थी वाक्यात ह्याचा उपयोग करतात.)

आमि सिगारेट खाइब ना ।
मी सिगरेट ओढणार नाही.

आमि ताहार बाड़ीते याइ ना ।
मी त्याच्या घरी जात नाही.

इहा करिओ ना ।
असे करू नकोस

तुमि करबे ना आमि करब ?।
तू करशील कि मी करू ?

তুমি না আমাকে বলেছিলে ?
तूच मला म्हणाला होतास ना ?

মনে ক'রে দেখ না।
आठवून पहा ना. (आठवण्याचा प्रयत्न कर).

আমায় যেতে দাও না।
मला जाऊ दे ना,

জল দাও না, (আমার) বড় তৃষ্ণা পেয়েছে।
पाणी दे ना, मला फार तहान लागली आहे.

গরীবের কতই না সুখ ?
गरीबाला किती सुख आहे ? (सुखाचा अभाव आहे. हचा अर्थी)

গরীবের কতই না দুঃখ ?
गरीबाला केवळ दुःख आहे? (भरपूर दुःख आहे हचा अर्थी)

যাও না, আমি কি তোমায় মানা করেছি ?
जा ना, मी काय तुला मनाई केली आहे?

যতই বল না কেন ? তা হবে না।
काहीही म्हटलेस तरी ते होणार नाही.

একি ? আজও তুমি আপিসে এলে না।
हे काय? आज सुद्धा तू ऑफिसात आला नाहीस?

গরীবের কিছুই নাই -না অন্ন না বস্ত্র।
गरीबाला काहीही नाही—ना अन्न ना वस्त्र.

আমাকে না বলিয়া তুমি কোথায় গিয়াছিলে ?
मला न सांगता तू कुठे गेला होतास?

তাহাকে কিছু বললে না ত ?
त्याला काही सांगितले नाहीस ना?

আমি না হেসে থাকতে পারি না।
मी हसू आवरू शकत नाही.

কেউ না কেউ সেখানে যাবেই।
कोणी ना कोणी तिकडे जाईलच.

না, আমি কলা খাই নি।
नाही, मी केळे खाल्ले नाही.

१७) নাকি

তুমি নাকি সেখানে যাবে?
तू तिथे जाणार हे खरे आहे काय?

তাই নাকি? তুমিও দেখেছ?
अस्सं काय? तुसुद्धा पाहिलंस?

সে নাকি চুরি ক'রে পালিয়ে গেছে?
तो चोरी करून पळून गेला आहे हे खरे नाही काय?

আমি নাকি আপনার উপর রাগ করিয়াছিলাম।
मी किनई तुमच्यावर रागावलो होतो.

শুনিয়াছি তুমি নাকি কলিকাতা যাইবে।
तू कलकत्त्याला जाणार असे मी ऐकले आहे.

মাথা খারাপ হয়েছে নাকি? করছ কি?
वेड तर नाही ना लागलं? काय करत आहेस?

१८) নাই (চলিত নি, নেই)

['নি' हे क्रिया घडली नाही हया अर्थीच 'চলিত' भाषेत वापरतात. 'নেই' हे नाही आहे (अभाव) व नाही हया अर्थी 'চলিত' भाषेत वापरतात.]

(१) वर्तमानकाळातील क्रियापदापुढे आल्यास पूर्णवर्तमान व पूर्णभूत ह्या काळांचा बोध होतो.

আমি কিছুই দেখি নাই (দেখিনি)
मी काहीही पाहिले नाही.

তিনি ঠিক সময়ে আপিসে পৌঁছিতে পারেন নাই (পারেননি)।
ते वेळेवर ऑफिसात पोहोचू शकले नाहीत.

[আমি মাছ খাই নাই।
मी मासे खाल्ले नाहीत.

আমি মাছ খাই না।
मी मासे खात नाही.

हा 'নাই' व 'না' च्या नकारार्थी वाक्यातील फरक लक्षात घ्यावा.

সে মাছ খাইয়াছিল না। সে মাছ খাইয়াছে না।
अशा वाक्यप्रयोग बंगाली भाषेत करत नाहीत. त्याबद्दल

"সে মাছ খায় নাই।
असाच वाक्यप्रयोग करतात.]

আমার কাছে টাকা নাই (নেই)
माझ्याजवळ पैसे नाहीत

(२) नाही (आहेच्या नकारार्थी) या अर्थी वर्तमानकाळी मुख्य क्रियापद म्हणून वापर करतात.

তাহাকে না চেনে এমন লোক নাই (নেই)।
त्याला ओळखत नाही असा मनुष्य नाही.

বাড়ীতে কেহ নাই (নেই)।
घरात कोणीही नाही

(३) नकारात्मक औचित्यार्थी वाक्यात 'ইতে' युक्त असमापिका क्रियापुढे वापर करतात.

মিথ্যা বলিতে নাই (নেই)।
खोटे बोलू नये.

চুরি করিতে নাই (নেই)।
चोरी करू नये.

(४) प्रश्नार्थक

সে এখনও আসে নাই (আসেনি)?
तो अजूनही आला नाही?

সে কিছু খায় নাই (খায়নি)?
त्याने काही खाल्ले नाही?

(५) विशेषणाप्रमाणे

(নেই) নাই মামার চেয়ে কানা মামা ভাল।
(मुळीच) मामा नसण्यापेक्षा आंधळा (किंवा एकाक्ष) मामा चांगला.

(६) नामाप्रमाणे

নাই বলিতে নাই। নেই বলিতে নেই (চলিত)
नाही म्हणावयाचे नाही.

১৯) কোথায় (কোথা), কই (কৈ),

আমরা কোথা হইতে আসিয়াছি? কোথায় যাইব? কেহই ইহা জানে না।
आपण कुठून आलो? कुठे जाणार? कोणालाच ठाऊक नाही.

('কোথা' चा नामाप्रमाणे वापर)

কোথায় সে বিদ্যুৎ চালিত ট্রেন আর কোথায় এই গোরুর গাড়ী?
कुठे ती विजेवर चालणारी आगगाडी व कुठे ही बैलगाडी?

তোমার বাড়ী কোথায়?
तुझे घर कुठे आहे? (ह्या वाक्यात प्रश्नकर्त्याला घर कुठे आहे, हे केवळ समजून घ्यावयाचे आहे घर त्याच्या दृष्टीपथात नाही)

তোমার বাড়ী কই?
तुझे घर कुठे आहे? (ह्या वाक्यात प्रश्नकर्ता घराच्या जवळपास असून त्याला घर पहावयाचे आहे.

কই, দেখি। कुठे आहे, पाहु द्या.

কই, বললে না ত?
काय सांगितले नाहीस ना?

কি মনে করেছিলাম, কই আর হ'ল।
ठरविले होते काय अन् झाले काय?

কই এখন বলতে পারি!
आता मी कसला बोलू शकतो.

কি কথা? কই আপনি ত কিছুই বলেন নি?
कोणती गोष्ट? आपण तर मला काहीच बोलला नाही?

२०) वस्तुतः, फलतः, वास्तविक, हया अव्ययांचा वापर

"আপনার পুত্রকে কালমুখে অর্পন করিয়া রাজকুমারের প্রানরক্ষা করা সামান্য পরিচারিকার পক্ষে সামান্য গৌরবের কথা নহে! বস্তুতঃ এই ধাত্রী নীচকুলোদ্ভবা রমনী নহেন; রাজপুতকুলে তাঁহার জন্ম - নাম ধাত্রী পান্না।" –যজ্ঞেশ্বর বন্দ্যোপাধ্যায়

आपल्या मुलाला कालाच्या तोंडात टाकून राजकुमारच्या प्राणाचे रक्षण करणे सर्वसाधारण दायीच्या बाबतीत माझ्या गौरवाची गोष्ट नाही ! खरोखरी ही दाई नीच कुळांत जन्मलेली स्त्री नाही. रजपूताच्या कुळात तिचा जन्म-नाव पन्ना दाई.

"ঠাকুরদাস এরূপভাবে বালকের পাঠ লইতেন যে, তদ্দর্শনে ঈশ্বরচন্দ্রের দৃঢ়বিশ্বাস জন্মিয়াছিল, পিতা ব্যাকরনে তর্কবাগীশ মহাশয়ের সমান পণ্ডিত। ফলতঃ পিতা পুত্রের পাঠ শুনিতে শুনিতে ব্যাকারণে বিশেষ ব্যুৎপত্তি লাভ করিয়াছিলেন।" চণ্ডিচরন বন্দ্যোপাধ্যায়

ठाकुरदास अशा रीतीने मुलाचे पाठ घेत कि, ते पाहून ईश्वरचंद्राची पक्की खात्री झाली होती कि वडिल व्याकरण विषयात तर्कवागीश महाशया इतके विद्वान आहेत. वास्तविक मुलाचे पाठ ऐकता ऐकताच वडिलांनी व्याकरण विषयात विशेष ज्ञान मिळविले होते.

সে অনেক লুটপাট করেছে, অনেক লোককে গুলি ক'রে মেরেছে। ফলতঃ তার ফাঁসির সাজা হ'ল।

त्याने पुष्कळ लूटालुट केली, पुष्कळांना गोळ्या घालून ठार केले परिणामी त्याला फाशीची शिक्षा झाली

"এই শোচনীয় হত্যাকাণ্ডের সংবাদ যখন ইউরোপের ভিন্ন ভিন্ন দেশে প্রচারিত হইল, তখন সকলেই শিহরিয়া উঠিল; সকলেই মনে মনে করিল, ব্যাপার বড়ই গুরুতর, এই ব্যাপার লইয়া এক মহা প্রলয়ের সূচনা হইবে। বাস্তবিক হইলেও তাহাই।"

ह्या शोचनीय हत्याकांडाची बातमी जेव्हा युरोपातल्या नाना देशात पसरली, तेव्हा सर्व लोकाचा थरकाप झाला; ही घटना फारच गंभीर आहे ह्या घटनेमुळे एका मोठ्या प्रलयाला सुरवात होईल असे सर्व लोकाना वाटले. खरोखर घडलेही तसेच

△ △ △

पाठ १७ वा : नामे, विशेषणे व क्रियापदांचा विभिन्नार्थी वापर

मागील पाठात अव्ययांचा निरनिराळ्या अर्थी वगैरेत कसा वापर होतो, ते आपण पाहिले. या पाठात नामांचा, विशेषणांचा व क्रियापदांचा निरनिराळ्या अर्थी कसा वापर होतो ते दाखविण्यात आले आहे. नमुन्यादाखल सात नामे, पांच विशेषणे व सहा क्रियापदे घेतली आहेत.

विशेष्य

१) कथा

आमि तोमार कोनओ कथा शुनते चाई ना।
मला तुझे काहीही ऐंकावयाचें नाही.

आपनार सङ्गे आमार एकटि कथा आछे।
मला आपणास काही सांगावयाचे आहें.

आज महाभारतेर कथा आरम्भ हइबे।
आज महाभारताची कथा सुरू होईल.

ए सम्पर्के आमार कोन कथा नाई।
ह्या संबंधी माझे काहीही म्हणणे नाही.

तार सङ्गे आमार कोन कथा नाई।
त्याच्याबरोबर माझी बोलचाल नाही

आपनार कथाय आमि चलिब।
आपल्या सल्ल्याप्रमाणे मी वागेन.

आपनार मत पण्डितेर सङ्गे आमार कि कथा?
आपल्यासारख्या पंडितांबरोबर माझी काय तुलना?

ए त भारी मजार कथा।
ही तर फार मजेशीर गोष्ट (घटना) आहे.

तुमि तोमार कथा राखिते पारिले ना।
तू तुझा शब्द पाळू शकला नाहीस.

কথায় বলে -"চোরে চোরে মাসতুত ভাই"।
"चोर चोर मावसभाऊ (एकाच माळेचे मणी) अशी म्हण आहे.

সে অনেক কথা।
ती फार मोठी गोष्ट आहे.

এ কথা কি সত্য ?
हे खरे आहे काय ?

এ ত মন্দ কথা নয়।
ही कल्पना काही वाईट नाही.

তিনি এককথার লোক; তাঁহার যে কথা সেই কাজ।
ते एकवचनी आहेत; जे बोलतात तेच करतात.

এ একটা কথার কথা।
ही (केवळ) एक सबब आहे.

আমি এটা কথায় কথায় বললাম।
मी हे बोलण्याच्या ओघात म्हणालो. 'कथाय्य कथाय्य' चा क्रिया-विशेषणाप्रमाणे वापर)

সে কথায় কথায় ঝগড়া করে।
तो विनाकारण (किंवा नेहमी किंवा प्रत्येक वावतीत) (शब्दश. बोलता बोलता) भांडण करतो. ('कथाय्य कथाय्यचा क्रियाविशेषणाप्रमाणे वापर)

এখন কথা হচ্ছে এই যে, তিনি আমাদের সাহায্য করতে সম্মত হবেন কি না।
ते आपल्याला मदत करायला तयार होतील कि नाही, हा आता प्रश्न आहे.

মোট (আসল) কথাটা এই যে আমি তোমার অসুখের খবরটা জানতাম না।
खरे; गोष्ट अशी आहे कि मला तुझ्या आजाराची माहिती नव्हती.

এটা কিন্তু বড় ভাল কথা নয়।
परंतु हे काही चागल्याचे लक्षण नव्हे. (ही फार गंभीर बाबत आहे)

তাই ত কথা
तोच तर प्रश्न आहे

তোমাকে তোমার বাবামহাশয়ের কথা রাখিতে হইবে।
तुला तुझ्या वडिलांची आज्ञा पाळली पाहिजे.

আমি নিজের কাজেই ব্যস্ত, পরের কথায় থাকি না।
मी माझ्या कामात गुंतलेला असतो, दुसऱ्याच्या भानगडीत पडत नाही.

তাঁহার আজকের অনুষ্ঠানে আসার কথা আছে।
त्यांनी आजच्या समारंभाला येण्याचें कबूल केलें आहे.

আমি তোমার সঙ্গে কথা কাটাকাটি করতে চাই না।
मला तुझ्याबरोबर वाद घालण्याची इच्छा नाही.

এখন বাজে কথা বন্ধ কর, সোজা কথা বল।
आता व्यर्थ बडबड करू नकोस, मूळ मुद्यावर ये.

দু'টি ভাইএ কথা নাই।
या दोघा भावांत बोलीभाषण नाही.

আজ তার আসবার কথা।
आज ते येणार (अपेक्षित) आहेत.

২) চোখ

সে মন্দ চোখে দেখে।
त्याची नजर वाईट आहे.

ভয় কর না তোমার প্রতি আমার চোখ আছে।
घाबरू नकोस, तुझ्यावर माझे लक्ष आहे.

পরের জিনিসে চোখ দিও না।
दुसऱ्याच्या वस्तूवर डोळा ठेवू नकोस.

তাহার চোখ উঠেছে, নতুবা সে না এসে থাকতে পারত না
त्याचे डोळे आले आहेत, नाहीतर तो आल्याशिवाय राहिला नसता

সর্বনাশ হবার পর তাহার চোখ খুলেছে (ফুটেছে)
सर्वनाश झाल्यावर त्याचे डोळे उघडले.

চোখ ঘুরিয়ে (পাকিয়ে, রাঙিয়ে) দেখছিস কেন ?
डोळे वटारून कशाला बघतोस ?

বিদায় নেবার সময় তাঁর চোখ ছলছল করতে লাগল।
निरोप घेण्याच्या वेळी त्याचे डोळे अश्रूनी भरून आले.

আমার চোখ অনেক দিন ধ'রে টাটাচ্ছে।
माझे डोळे पुष्कळ दिवसापासून दुखत आहेत.

আমি প্রথম হয়েছি ব'লে তোমার চোখ টাটাচ্ছে কেন?
मी पहिला आलो म्हणून तुला का मत्सर वाटतो?

আমি তোমাকে চোখ টিপে (ঠেরে) বোঝাচ্ছিলাম।
मी तुला डोळ्यानी खुणवून समजावत होतो.

আমাকে ধাক্কা দিলে যে, চোখের মাথা খেয়েছ নাকি?
मला धक्का दिलास, आंधळा झाला आहेस कि काय?

ওই লোকটা আমার চোখের বালি।
तो मनुष्य मला अगदी अप्रिय आहे.

চোখের বালি, চক্ষুশূল–
डोळ्यात खुपणारी व्यक्ति)

তাঁহার চোখে ছানি পড়িয়াছে।
त्याच्या डोळ्यात फुल पडले आहे.

একমাত্র পুত্র ব'লে তাহার মাতা পিতা তাহাকে চোখেচোখে রাখেন
एकुलता एक मुलगा म्हणून त्याचे आईवडिल त्याला नेहमी नजरेसमोर ठेवतात.

তিনি চোখ কাটাইতে হাসপাতালে গিয়াছেন।
डोळ्यातील फुल (शस्त्रक्रियेने) काढण्याकरिता ते इस्पितळात गेले आहेत

চোখের পলকেই ডাকাতেরা লুটফাট করিয়া পলাইয়া গেল।
निमिषार्धात्च लूटालूट करून दरोडेखोर पळून गेले

আমার চোখে ধুলা দিতে অনেকে অসফল হইয়াছে।
माझ्या डोळ्यात धूळ फेकण्यात (मला फसविण्यात) पुष्कळजण अयशस्वी झाले आहेत

তালিকায় একটু চোখ বুলাইয়া দেখি।
यादीवर जरा नजर टाकू द्या. (फिरवू द्या)

এই প্রদর্শনীতে চোখে পড়বার মত কিছুই নাই।
हया प्रदर्शनात डोळ्यात भरण्यासारखे असे काहीही नाही.

তিনি আড়চোখে সকলের দিকে দেখিতেছিলেন।
ते तिरक्या नजरेने सर्वांकडे पहात होते.

এই ছেলেটি আমার চোখের তারা।
हा मुलगा मला अत्यंत प्रिय आहे.

আমার চোখের উপরই খুনটা হইয়া গেল।
माझ्या डोळ्यासमोरच खून झाला.

তোমার চোখের ভুল হইল, তাহা না হইলে তুমি পাঁচ টাকার নোটের বদলে দশ টাকার নোট দিতে না।
तुझी नजरचुक झाली, नाहीतर तू पाच रुपयाच्या नोटेऐवजी दहा रुपयांची नोट दिली नसतीस.

আমার সঙ্গে চোখাচোখি হ'তেই সে চোখ পাকিয়ে দেখতে লাগল
माझा नजरेला नजर भिडताच तो डोळे वटारून पाहू लागला.

"চোখে আঙ্গুল দিয়া দেখাইয়া দিলে লোকে দেখিতে পাইবে।" –শরৎচন্দ্র
स्पष्टपणे नजरेला आणून दिल्यावर लोकांना दिसेल.

"তোমাদের চোখের চামড়া পর্যন্ত নাই।" –শরৎচন্দ্র
तुम्हाला मुळीच लाज नाही.

৩) মন

তোমার বক্তব্য তার মনে লেগেছে (বা ধরেছে)।
तुझे बोलणे त्याना पसंत पडले आहे.

আপনার কথায় তাহার মন গলিয়া গিয়াছে।
आपल्या बोलण्याने त्याचे मन विरघळले आहे. (द्रवले आहे)

আমার মনে হয় কিছুতেই কিছু হইবে না।
कशाचाच काहीही उपयोग होणार नाही असे मला वाटते.

পড়াশুনায় তাহার মন নাই।
अभ्यासात त्याचे लक्ष नाही.

মন দিয়ে (বা লাগাইয়া) পড়াশুনা কর।
लक्षपूर्वक अभ्यास कर.

আমি মনের মত চাকরি পেয়েছি।
माझ्या मनासारखी (आवडीची) मला नोकरी मिळाली आहे.

দীপাবলির ছুটিতে কাশ্মীর যাব মনে করেছিলাম।
दिवाळीच्या सुटीत काश्मीरला जाण्याचे मी ठरविले होते.

তাহাদের মধ্যে মন কষাকষি চলছে।
त्यांचे संबंध दुरावले आहेत

মনের মিল যেখানে নাই সেখানে সুখশান্তিতে থাকা অসম্ভব।
एकमेकाविषयी सद्भाव जिथे नाही, तिथे सुखासमाधानाने राहणे अशक्य आहे.

তোমার মন কে কেড়ে নিয়েছে।
तुझे मन कोणी आकर्षित केले आहे?

সমুদ্র দেখিলেই আমার মন কেমন করে।
समुद्र पाहताच माझे मन चंचल (अस्थिर) होते.

তাহার অবস্থা দেখিয়াই আমার মন খারাপ হইয়াছে।
त्याची स्थिती बघूनच मी उदास झाली आहे.

সে মন খোলা লোক যা মুখে আসে তাই বলে।
तो (अगदी) मोकळ्या मनाचा आहे, जे तोंडात येते ते बोलतो.

এই মন গড়া কথায় আমি বিশ্বাস রাখতে পারি না
ह्या कल्पित गोष्टींवर मी विश्वास ठेवू इच्छित नाही.

আমি তোমার মন জানতে পারলাম না
मी तुझे मन ओळखू शकलो नाही.

আমার মন কিছুতেই টলবে না।
माझे मन कशानेही विचलित होणार नाही.

সে তোমাকে মন থেকে ভালবাসে।
ती तुझ्यावर मनापासून प्रेम करते.

সে আপন -মনে (বা মনে মনে) বলতে লাগল।
तो स्वतःशीच बोलू लागला.

কোন মনচোর তোমার মন টেনেছে ?
कोणत्या चित्तचोराने तुझे मन आकर्षित केले आहे ?

আমার কথাটি মনে রেখো, ভুলো না যেন।
माझे म्हणणे लक्षात ठेव, विसरू नकोस.

তুমি আজকে বড় মন-মরা দেখাচ্ছে।
तू आज अगदीच उदास दिसत आहेस.

আজ আমার মন ভাল নেই।
आज मी चांगल्या मनस्थितीत नाही.

আজকে সাঁতার কাটিতে মন হচ্ছে।
आज (मला) पोहायची इच्छा होत आहे.

সেই অপূর্ব দৃশ্য দেখে আমার মন হারাল।
तेच अपूर्व दृश्य पाहून मी स्वतःला विसरून गेलो.

তিনি কি পরামর্শ দিয়েছেন মনে কর।
त्यानी काय सल्ला दिला होता तो आठव.

তোমার মনে ত কিছুই থাকে না।
तुझ्या लक्षात तर काहीच राहत नाही.

যার মনে জোর নেই, তার কিছুই নেই।
ज्याच्यापाशी मनोबल (आत्मविश्वास) नाही त्याच्याजवळ काहीही नाही.

সে তোমায় মনে-প্রাণে ভালবাসে।
ती तुझ्यावर जीवापलीकडे प्रेम करते.

তিনি আমায় নিজের ভাইয়ের মত মনে করেন।
ते मला स्वतःच्या भावाप्रमाणे समजतात.

ইতঃ পূর্বে ইহা মনে করা হয় নাই।
ह्यापूर्वी ह्याचा विचार करण्यात आला नव्हता.

এই কল্পনাটি হঠাৎ আমার মনে এল।
एकाएकी ही कल्पना मला सुचली.

কিছুতেই তাহার মন উঠে না।
कशानेही त्याचे समाधान होत नाही

আমার মন এখন কিছুই চায় না।
मला आता कसलीच इच्छा नाही.

সংসারের দিকে তাঁর মন যায় না।
संसाराकडे त्याची प्रवृत्ति नाही.

যার তার মন যোগান আমার কাজ নয় বন্ধু!
मित्रा, ज्याला त्याला खुश करणे (हे) माझे काम नाही.

"মনে পড়ে সেই প্রথম দেখার স্মৃতি।"
त्या पहिल्या भेटीची (मला) आठवण येते.

"আমার মনের মানুষ এল দ্বারে।"
माझा प्रियकर दारापाशी आला.

"চলেছে পথিক আলোকযানে আঁধার পানে মনভুলানো মোহন-
-তানে গান গাহিয়া।" রবীন্দ্রনাথ
मनाला भुलविणाऱ्या मोहक सुरात गाणे गात वाटसरू प्रकाशरूपी वाहनाने
अंधाराकडे चालला आहे.

"মন দিল না বধু, মন নিল যে শুধু।"
हे रमणी, तू (मला) मन दिल नाहीस, केवळ (माझ) मन हरण केलस.

(৪) মাটি

সে যেন একটা মাটির পুতুল।
ती जणू काही एक मातीची बाहुली आहे.

যার লাঠি তার মাটি।
ज्याची लाठी त्याची जमीन.

ঐ চারা গাছটাকে মাটিতে বসাও।
ते रोपटे जमीनीत लाव.

সে এত খেটেছে কিন্তু এখনও তার পায়ের তলায় মাটি থাকে নি।
त्याने इतकी मेहनत केली परंतु अजूनही तो स्थिर झाला नाही.
(जीवनात स्थैर्य आले नाही.)

ছেলেটা মাটি হ'য়ে যাবে।
मुलगा बिघडून जाईल.

আমার সকল পরিশ্রম তোমরা মাটি করেছ।
माझी सर्व मेहनत तुम्ही फुकट घालवलीत.

তোমার মত কৃতঘ্ন লোককে টাকা দিয়ে আমি মাটি খেয়েছি।
तुझ्यासारख्या कृतघ्न माणसाला पैसे देण्याची मी मूर्खपणा केला आहे (त्याबद्दल मला पश्चात्ताप होत आहे.)

ঐ পুকুরের মাটি এখনও তোলা হয় নাই।
त्या तळ्यातील चिखल अजूनही उपसला गेला नाही.

তাহাকে মাটি দেবারও জায়গা কেহ দিল না।
त्याला पुरायलासुद्धा कोणी जागा दिली नाही.

সাত মাসের মধ্যে এদিকের মাটি মাড়াবার সময় পেলাম না।
सात महिन्यात इकडे येण्याला मला वेळ मिळाला नाही

চোর বাজারে সকল জিনিষ মাটির দরে বিক্রি হয়।
चोरबाजारात सर्व वस्तू फार स्वस्त किमतीला विकल्या जातात.

তাঁর মত মাটির মানুষ আমি এখনও দেখি নাই।
त्याच्यासारखी सहनशील व शांत स्वभावाची व्यक्ती मी अजूनही पाहिली नाही.

সারাজীবন তোমাদের জন্য দেহ মাটি করেছি, আর এখন তোমরা আমাকে অপমান কর?
आयुष्यभर मी तुमच्याकरिता देह झिजविला आणि आता तुम्ही माझा अपमान करता?

(৫) মাথা

চাকরি ক'রে হবে কি মাথা?
नोकरी करून कसला फायदा होणार कपाळाचा?

আমার মাথা খারাপ হ'য়ে গেছে।
तुझं डोकं बिघडलं आहे.

ছেলেটি মাথায় উঠিয়াছে (বা চড়িয়াছে)।
मुलगा डोक्यावर बसला आहे. (कोणालाच जुमानत नाही.)

রাগের মাথায় মানুষ কি করে না?
रागाच्या आहारी जाऊन मनुष्य काय करीत नाही.

আমার বাবা মহাশয় এই গাঁয়ের (গ্রামের) মাথা।
माझे वडिल ह्या गावाचे मुख्य आहेत.

রাস্তার মাথায়ই আমার বাড়ী।
रस्त्याच्या सुरवातीलाच माझे घर आहे.

তাঁহার মাথা বেশ পরিস্কার।
त्याचे डोके फार चागले आहे (ते बुद्धिमान आहेत.)

ডাকাতেরা তাঁহার মাথা উড়িয়ে দিল।
डाकूनी त्याचा खून केला. (शब्दश: डोके उडविले.)

তুমি কি আমার মাথা করবে?
तू माझे काय करू शकणार आहेस? काहीही नाही हया अर्थी)

আমার মাথা খাও, যদি তুমি চলন্ত গাড়ীতে চড়।
माझी तुला शपथ आहे, "तू चालत्या गाडीत चढू नकोस" (शब्दश: जर तू चालत्या गाडीत चढलास तर ते माझे डोके खाल्ल्याप्रमाणे होईल)

অঙ্ক কষিতে হ'লে মাথা খেলাতে হয়।
गणिते सोडवावयाची असल्यास डोके चालवावे लागते.

মাথা গরম ক'রে কোন লাভ নেই, মাথা ঠাণ্ডা কর।
रागावून काही फायदा नाही, डोक थंड ठेव.

যেখানে লাভ নেই সেখানে মাথা ঘামানোর কোনও মানে হয় না।
जिथे लाभ नाही तिथे डोक्याला निष्कारण त्रास देण्यात काहीच अर्थ नाही.

তাঁর মাথা ধরেছিল ব'লে তিনি শুধু মাথা নেড়ে সম্মতি দিলেন।
त्याचे डोके दुखत होते म्हणून त्यानी केवळ मान हालवून संमति दिली.

কিছু করিতে হইলে সে আগে মাথা চুলকায়।
काही करावयाचे असले की तो पहिल्याने डोके खाजवितो.

আমি তোমার জন্য মাথা দিতে চাই না।
मी तुझ्याकरिता मरू इच्छित नाही.

এ কাজে কেহই মাথা দিতে রাজী নেই।
ह्या कामात कोणीही लक्ष घालावयास तयार नाही.

কি মাথা মোটা লোক ! এই সোজা কথা এখনও তোমার মাথায় ঢুকে নি।
ही साधी गोष्ट अजूनसुध्दा तुझ्या डोक्यात शिरली नाही?

এখন কার মাথায় হাত বোলাতে যাচ্ছ।
आता कोणाच्या डोक्यावरून हात फिरवायला जात आहेस? (फसवायला जात आहेस?)

তাহার মাথার উপর কেহ ছিল না বলিয়া সে এত খারাপ হইয়াছে।
त्याच्यावर कोणाचा ताबा नसल्यामुळे तो इतका बिघडला आहे.

একদিন তোমরা দেশের মাথা হবে।
एकेदिवशी (भविष्यकाळी) तुम्ही देशाचे पुढारी व्हाल.

একটা পাখী গাছের মাথার উপর উড়িয়া বসিল।
एक पक्षी झाडाच्या शेंडयावर उडून बसला

পাহাড়ের মাথায় বরফ জমেছে।
पर्वताच्या शिखरावर बर्फ गोठले आहे.

পতির মৃত্যুর পর তিনি মাথা গোঁজবার জায়গাটুকু পর্যন্ত পেলেন না।
पतिनिधनानतर त्याना कुठेही आसरा मिळाला नाही. (शब्दश. त्याना डोके शिरकवायलाही जागा मिळाली नाही)

অনেক দুঃখকষ্ট ভুগিবার পর সে এখন মাথা উঁচু করেছে (বা –মাথা তুলেছে)
पुष्कळ त्रास सहन केल्यावर आता त्याचा उत्कर्ष झाला आहे.

মেয়েটা পালিয়ে গেছে ব'লে তার মাথা কাটা গেছে।
मुलगी पळून गेल्यामुळे त्याची मानहानी झाली आहे.(किंवा त्याला लाज वाटत आहे.)

তার মাথা মাটি হ'য়ে গেছে।
त्याची विचारशक्ति खलास झाली आहे.

আমি আপনার পরমার্শ সর্বদা মাথায় করিয়া থাকি।
मी आपला सल्ला नेहमी शिरोधार्य मानतो.

"কার ঘাড়ে দু'টো মাথা আছে বাবা যে চন্দ্রগুপ্তের রাজ্যে ডাকাতি করে?" দ্বিজেন্দ্রলাল রায়
चद्रगुप्ताच्या राज्यात दरोडा घालण्याएवढे कोणामध्ये धाडस आहे दादा?

"তার বিশ্বাস তুই আমার মাথাটা খেয়েছিস।"
तू माझा सर्वनाश केलास अशी त्याची खात्री आहे

"ও আমার দেশের মাটি, তোমার পায়ে ঠেকাই মাথা।" রবীন্দ্রনাথ
हे माझ्या देशातील म्हत्तिके, मी तुझ्या चरणाना वदन करितो.

(৬) মুখ

এমন কথা মুখে আনিতে নাই।
असे बोलू नये.

মুখ সামলে কথা বল।
तोंड सांभाळून बोल.

সে মুখের উপরই তাঁহাকে গালাগালি দিল।
त्याने तोंडावरच त्याना शिव्या दिल्या.

এই বলিতে তাহার মুখ নাই।
असे बोलायला त्याला तोंड नाही.

এমন কথা তোমার মুখে এল কি ক'রে।
असे तू कसे म्हणालास?

এখন তিনি মুখ খুলেছেন (বা তাঁহার মুখ ফুটেছে।)
आता त्यानी बोलावयाला सुरवात केली.

'যত বড় মুখ নয় তত বড় কথা।' –প্রবাদ
लहानतोंडी मोठा घास

তুমি কোন মুখে এ কথা তাঁহাকে বলিলে?
तू ही गोष्ट त्यांना सांगण्याचे धाडस कसे केलेस?

এই ছেলেটি বাপের মুখ রাখিবে।
हा मुलगा वडिलांचे नाव राखील.

সে একটি মুখচোরা মেয়ে।
ती एक लाजाळू मुलगी आहे.

সরলা মুখ টিপে হাসতে লাগল।
सरला गालातल्या गालात हसू लागली.

তোমার মুখে ফুলচন্দন পড়ুক।
तुझ्या तोंडात साखर पडो. (तुझे कल्याण होवो.)

মুখে মুখে এই সংবাদ প্রচারিত হইল।
तोडोतोडी ही बातमी पसरली.

মুখের মত জবাব দিলে ত?
योग्य उत्तर दिलेस ना?

অপরাধ করিলে মুখ টিপিয়া থাকিবে।
अपराध केला असता तोंड बंद ठेवावे.

ফোড়াটা মুখ লইয়া উঠিয়াছে।
फोडाला तोंड फुटू लागले आहे.

মুখ খারাপ করছিস কেন?
अश्लील भाषेत शिवीगाळ कशाला करतोस?

চাকরি চ'লে গেছে ব'লে তার মুখ চুন হ'য়ে গেছে।
नोकरी गेल्यामुळे त्याचे तोंड उतरले आहे.

মুখ আলগা মানুষকে বিশ্বাস করিতে নাই।
फुटक्या तोंडाच्या माणसावर विश्वास ठेवू नये

আমি বেশী কিছু খাই নি, শুধু চারটে রসগোল্লা মুখে দিয়েছি।
मी काही फार खाल्ले नाही, फक्त चार रसगुल्ले खाल्ले.

তার বড় বেশী মুখ হয়েছে দেখছি।
तो फार शेफारला असे दिसते.

তার মুখের জোর আছে।
तो फार बडबडया आहे.

তোমার এত ভারি মুখ কেন?
तू एवढा उदास का झाला आहेस?

আমার বাড়ীটি পূর্বমুখো।
माझे घर पूर्वाभिमुख आहे.

তার মুখ দিয়ে জল পড়ছে।
त्याच्या तोंडाला पाणी सुटले आहे.

তার মুখের কথা কেড়ে নিয়ে আমি বললাম।
त्याचे म्हणणे मी (पुढे) चालू ठेवले.

আমি রড় মুখ করে আপনার কাছে এসেছি।
मी मोठ्या आशेने आपणांकडे आलो आहे.

বিক্রেতার মুখ না হ'লে সে বিক্রি করবে কি ক'রে?
विक्रेता बोलण्यात कुशल नसल्यास तो विक्री कशी करील?

বাঘের গুহামুখেই আমরা মৃত ষাঁড়কে দেখিলাম।
वाघाच्या गुहेच्या प्रवेश मार्गावरच आम्ही मेलेल्या बैलाला पाहिले.

ঝড়ের মুখে বড় বড় গাছ উন্মুলিত হয়।
वादळाच्या तडाख्यात मोठमोठी झाडे उन्मळून पडतात.

দুর্যোধন পাণ্ডবদের সূচের মুখাগ্র পর্যন্ত জমি দিতে রাজী হইল না।
दुर्योधन पाडवाना सूईच्या टोकावर राहील एवढीदेखील जमीन द्यावयास तयार झाला नाही.

রোজ তাহাকে আটটি মুখের আহার জোটাতে হয়
रोज त्याला आठ माणसाच्या आहाराची सोय करावी लागते.

"তোমারই মুখ চাহিয়া বসিয়া আছি।"
मी तुझ्याच आशेवर आहे.

(৭) হাত

এখন হাত কামড়ালে কি হবে?
आता पश्चात्ताप करून काय होणार.

ও হে হাত চালাও, হাত গুটিয়ে বসেছ কেন?
अरे हात चालवा, काम थाबवून कशाला बसला आहात?

এ কাজে হাত দিতে তিনি রাজী নন।
ह्या कामाला सुरवात करायला ते तयार नाहीत.

আমি হাত ধুয়ে বসেছি, ছেলেটি কখনও শোধরাবে না।
मी आशा सोडली आहे, मुलगा कधीच सुधरणार नाही.

একটু হাত বাড়াও দেখি !
जरा हात पुढे कर पाहू!

জাদুকরের হাত – সাফাই দেখে আমি গালে হাত দিলাম।
जादुगाराची हातचलाखी पाहून मी आश्चर्यचकित् झालो.

হাতের ঢিল ছুঁড়ে দিলে আর ফেরে না।
संधी गमावली कि परत येत नाही.

মাথায় (বা কপালে) হাত দিলে কি হবে।
निराश होऊन कसे चालेल?

তুমি কি হাত দেখতে (বা গুনতে) জান ?
तुला हातावरून भविष्य सांगता येते काय ?

ডাক্তারবাবু রোগীর হাত দেখিতেছেন।
डॉक्टरसाहेब रोग्याची नाडी पहात आहेत.

তোমার হাতে এখন কি কি কাজ আছে।
तुझ्या हाताशी आता कोणती कामे आहेत ?

এখনও তাহা আমার হাতে আসে নি।
अजूनही ते माझ्या ताब्यात आलेले नाही.

তখন সকলে হাত উঠাইল।
तेव्हा सर्वांनी हात वर केले.

আইনের হাত থেকে কেহই নিস্তার পাইবে না।
कायद्याच्या कचाटयातून कोणीही सुटणार नाही.

ওর গায়ে হাত তুলছিস কেন ?
त्याला का मारत आहेस ?

কুয়াটা কত হাত গভীর ?
विहीर किती हात खोल आहे ?

রমেশ ও মহেশ হাতে হাত দিয়া বেড়াইতেছিল।
रमेश व महेश हातात हात घालून फिरत होते.

এখন তাহারা হাতে হাত মিলিয়েছেন।
आता ते एकमताने वागतात.

আমার হাতে তোমাদের কোনও কষ্ট ভোগ করিতে হইবে না।
माझ्या हातांखाली तुम्हाला कोणतेच हाल भोगावे लागणार नाहीत.

লড়াইয়ের সময় প্রত্যেক সৈনিককেই প্রাণ হাতে করিয়া থাকিতে হয়।
लढाईच्या वेळी प्रत्येक सैनिकाला शीर तळहातावर ठेवावे लागते. (जीव धोक्यात घालावा लागतो.)

চোরটা হাতে-নাতে ধরা পড়িল।
चोर मुद्देमालासकट सापडला.

পুলিশকে হাত ক'রে সে চোরাই মাল বিক্রি করল।
पोलिसांना वश करून त्याने चोरीचा माल विकला.

রহমান এখন চুরি বিদ্যায় হাত পাকিয়েছে।
रहमान आता अट्टल चोर बनला आहे.

এখন হাত জোড়া আছে, অন্য কোনও দিন এস।
आता मी कामात गुंतलो आहे, दुसऱ्या कोणत्यातरी दिवशी ये.

সে বড় হাত ভারী লোক, তোমাদের একটা পয়সাও দেবে না
तो फार चिक्कू आहे तुम्हाला एक पैसाही देणार नाही.

যখন কোনও কাজ করতে চাও' হাতে হাতে কর, দেরী করায় কোনও লাভ নাই
जेव्हा कोणतेही काम करावयाची इच्छा असेल, तेव्हा ते ताबडतोब करा. उशीर करण्यात काहीच फायदा नाही.

পলিটেকনিক ইস্কুলে প্রত্যেকটি জিনিষ হাতে কলমে করতে হয়।
पॉलिटेक्निक स्कूलमध्ये प्रत्येक वस्तु स्वतःच्या हातानी बनवावी लागते.

কত লোক তোমার হাত ধরা আছে?
किती लोक तुला वश आहेत?

ইহাতে তাহার কোনও হাত নাই।
ह्यात त्याचा काहीही संबंध नाही.

চাকরিটা দেওয়া না দেওয়া তাঁরই হাতে।
नोकरी देणे न देणे त्यांच्याच हाती आहे.

তিনি আমাকে খালি হাতেই বিদায় ক'রে দিলেন।
त्यानी माझी रिकाम्या हातानीच बोळवण केली.

মানী লোক না খেয়ে মরবে কিন্তু কারও কাছে হাত পাতবে না
मानी मनुष्य न खाता मरेल परंतु कोणापुढेही हात पसरणार नाही.

"লোকটাকে একবার হাতে পেলে হয়।"
तो मनुष्य एकदा तावडीत सापडला पाहिजे

"ঘরের জিনিষ পত্র সাবধান রাখিও, চাকরটির একটু হাত –টান আছে।"
घरातल्या वस्तु नीट ठेव, नोकराला थोडीशी चोरीची सवय आहे.

"রাম হাত জোড় করিয়া বলিল, আর করব না বৌদি।" শরৎচন্দ্র
राम हात जोडुन म्हणाला, "वैनी मी यापुढे (असे) करणार नाही.' शरच्चंद्र

বিশেষণ

(১) কাঁচা

কাঁচা তেঁতুল খাইলে পেটে ব্যথা হয়।
कच्ची चिंच खाल्ल्यानें पोटात दुखते.

বন্য পশুরা কাঁচা মাংস খায়।
वन्य पशु कच्चे (न शिजवलेले) मास खातात.

এই ত কাঁচা ইটের তৈরী বাড়ি।
ही तर कच्च्या (न भाजलेल्या) विटांनी तयार केलेली इमारत आहे.

বোম্বাইতে কাঁচা রাস্তা নাই বললেই হয়।
मुंबईत कच्चे (मातीचे) रस्ते नाहीत म्हटले तरी चालेल.

ছেলেটি লেখা পড়ায় বড় কাঁচা।
मुलगा अभ्यासात फार कच्चा (मंद) आहे.

তোমার ত সব কাজই কাঁচা।
तूझे तर सर्वच काम कच्चे (अविचाराने केलेले) असते.

এখন কাঁচা পয়সা নিয়ে কাঁচা রসিদ দাও।
आता नगद पैसे घेऊन मला कच्ची पावती दे.

এই শাড়িটার রং কাঁচা।
ह्या साडीचा रंग कच्चा (धुतल्यावर सहज जाणारा) आहे.

আমাকে কাঁচা ঘুম হ'তে ওঠালে কেন ?
मला अर्धवट झोपेतून का उठविलेस ?

এখন কাঁচা মাল বিদেশে যায় না।
आता कच्चा माल परदेशात जात नाही.

হরিন কাঁচা ঘাস খায়।
हरिण कोवळे गवत खाते.

কাঁচা বয়সে আর কাঁচা বুদ্ধিতে গুরুজনের পরমর্শ মত চলিবে।
तरुण वयात व बुध्दी अपरिपक्व असताना वडिल मंडळीच्या सल्याप्रमाणे वागावे.

কাঁচা পয়সার লোভ সম্বরণ করা বড় কঠিন।
सहज मिळणाऱ्या पैशाचा लोभ आवरणे फार कठीण असते.

এত বয়স হওয়া সত্বেও এখনও তাঁহার চুল কাঁচা।
इतके वय होऊनसुध्दा अजुनही त्याचे केस काळे आहेत

কাঁচা কাঠ পোড়ালে বেশী ধোঁয়া হয়।
ओले (न वाळलेले) लाकूड जाळल्याने फार धूर होतो.

তাহার হাতের লেখা এখনও কাঁচা।
अजुनही त्याच्या हस्ताक्षराला वळण नाही.

পাড়াগাঁয়ে লোকেরা কাঁচা বাড়িতে থাকে।
खेडेगांवात लोक मातीच्या घरात राहतात.

এইটি কাঁচা লোকের কাজ নয়।
हे अनुभवी माणसाचे काम नव्हे

কাঁচা দুধ কখনও খাইতে নাই।
कच्चे (गरम न केलेले) दूध कधीही पिऊ नये

স্বর্ণকারেরা এখন কাঁচা (বা পাকা) সোনার গয়না তৈরী করতে পারে না।
हल्ली सोनार शुद्ध सोन्याचे दागिने तयार करू शकत नाहीत.

সে একটি কাঁচা চাকুরি পেয়েছে।
त्याला एक तात्पुरती नोकरी मिळाली आहे.

ছেলেটা এত কাঁচা নেই যে কেউ তাহাকে ঠকাবে।
कोणी फसविण्याइतका काही तो मुलगा मूर्ख नाही.

চল্লিশ নয়া পয়সা করে কাঁচা সের পাওয়া যায়।
कच्या शेराला (नियमापेक्षा कमी माप) चाळीस नये पैसे हया दराने दूध मिळते.

(২) পাকা

পাকা আম মিষ্টি লাগে।
पिकलेला आंबा गोड लागतो.

সে পাকা ইটের তৈরী বাড়িতে (বা পাকা বাড়িতে থাকে।
तो पक्या (भाजलेल्या विटांनी तयार केलेल्या) इमारतीत राहतो

গ্রামে গ্রামে এখন পাকা রাস্তা তৈরী হয়েছে
प्रत्येक गावात आता पक्का रस्ता तयार झाला आहे.

চুল পাকা হয়েছে, কিন্তু বুদ্ধি এখনও পাকা হয় নি।
त्याचे केस पिकले आहेत परंतु बुद्धी अजूनही अपरिपक्वच आहे.

এই কাপড়টির রং পাকা।
हया कापडाचा रंग पक्का आहे.

আমি তাহাকে এখনও পাকা কথা দিই নাই।
मी त्याला अजूनही शेवटचा शब्द दिलेला नाही.

পাকা লোকের পরামর্শ মত চলিবে
अनुभवी माणसाच्या सल्ल्यानुसार वागावे

তাহাকে বিশ্বাস কর না, সে একেবারে পাকা বদমায়েস।
त्याच्यावर विश्वास ठेवू नकोस, तो अगदी पक्का बदमाष आहे.

একজন পাকা কারিগরের দরকার পড়েছে।
एका कुशल कारागिराची गरज भासू लागली आहे.

তাহার হাতের লেখা বড়ই পাকা।
त्याचे हस्ताक्षर फारच वळणदार आहे.

পাকা দলিল করিতে হইলে উকিলের কাছে যাইতে হয়।
कायद्यानुसार दस्तऐवज करायला वकिलाकडे जावे लागते

পাকা হাড় না হ'লে এত কষ্ট কেহই সহ্য করতে পারবে না
श्रम करण्याची सवय नसेल तर एवढा त्रास कोणीही सहन करू शकणार नाही.

রমেশ এখন পাকা চাকরি পায় নাই।
रमेशला अजूनही कायमची नोकरी मिळाली नाही.

পাকা কাঠ কোথায় পাওয়া যাবে ?
रापवलेले इमारती लाकूड कुठे मिळेल ?

ঐ পাকা ছেলের সঙ্গে মিশিও না।
त्या फाजील मुलाबरोबर मिसळू नकोस.

শান্তার পাকা দেখা তো কালই হ'য়ে গেছে।
शांताचा बाऊनिश्चय तर कालच झाला.

ছেলেটি ইংরাজীতে পাকা
त्या मुलाचे इग्रजी चांगले आहे.

গুণ্ডাদের পাকা বন্দোবস্ত করিতে হইবে।
गुंडांचा पक्का बंदोबस्त (पुरा बीमोड) केला पाहिजे.

আমি যা বলছি পাকা খবর।
मी जे सागत आहे, ते अगदी पूर्णपणे विश्वसनीय आहे.

৩) ভাঙ্গা

বোম্বাইতে এখন ভাঙ্গা বাড়িও পাওয়া যায় না
मुंबईत आता मोडके घरसुद्धा मिळत नाही.

হাড়ভাঙ্গা খাটুনিতে সে এখন দুর্বল হয়েছে।
अतिशय मेहनत केल्यामुळे तो आता दुबळा झाला आहे.

আমার ভাঙ্গা কপাল তা না হ'লে এরকম হ'ত না।
माझे नशीबच फुटके ! तसे नसते तर असे झाले नसते.

ছোট বাচ্চাদের ভাঙ্গা কথা শুনিতে আমার খুব ভাল লাগে।
लहान मुलाचे अस्पष्ट बोल ऐकायला मला फार आवडते.

তোমার ভাঙ্গা ইংরেজী আমি শুনতে চাই না।
तुझे मोडके-तोडके इग्रजी ऐकू इच्छित नाही.

বিদায় নেবার সময় তিনি ভাঙ্গা গলায় দু-চারটে কথা বললেন।
निरोप घेण्याच्या वेळी कठ दाटून आलेल्या अवस्थेत ते चार शब्द बोलले.

একটা ভাঙ্গা টাকাও আমার কাছে নাই।
एका रुपयाची मोडमुद्रा माझ्याजवळ नाही.

(৪) ভাল

ভাল উপায় খুঁজিতে হইবে।
चागला उपाय शोधून काढला पाहिजे.

সে এখন ভাল হয়েছে।
तो आता वळणावर आला आहे. (किंवा तो आता बरा झाला आहे)

কাল আমার শরীর ভাল ছিল না।
काल मला बरे वाटत नव्हते.

তোমার ভাল হউক।
तुझे भले होवो.

তিনি একজন ভাল লোক।
ते एक चांगले (किंवा शांत) गृहस्थ आहेत.

আমি বেশ ভালই আছি।
मी अगदी मजेत आहे.

তিনি একজন ভাল শিক্ষক।
ते एक चांगले (किंवा कुशल) शिक्षक आहेत.

সর্বদা লোকের ভাল করিবে।
नेहमी लोकांचे चागले (लोकावर उपकार) करावे.

ভাল, তোমার মনের মতই হ'য়ে যাক।
ठिक आहे, तुझ्या मनासारखे होऊ द्या.

তিনি তোমাকে একটি ভাল কথা বলিতে চান।
ते तुला एक हिताची गोष्ट सांगू इच्छितात.

ভাল কথা, তুমি কখন কলিকাতা যাইবে?
महज आठवण झाल्यावरून (किंवा ओघाने आले म्हणून) विचारतो तू कलकत्त्याला कधी जाणार?

ছেলেটি অঙ্কে খুব ভাল।
मुलगा गणितात फार चागला आहे.

তাঁহার চালচলন খুব ভাল।
त्याची वागणूक फार चागली आहे

তোমার ভালর জন্য আমি বলছি।
तुझ्या भल्याकरिताच मी सांगतो

একটি ভাল দিনে আমি কার্যারম্ভ করিব।
एका शुभ दिवशी मी कामाला सुरवात करीन.

তুমি তাহাকে আশ্রয় না দিলে তাহা ভাল দেখাবে না।
तू त्याला आधार दिला नाहीस तर ते बरे दिसणार नाही.

মন্দের ভাল এই যে কোনও লোক মারা যায় নাই।
वाईटात चागले एवढेच की, कोणीही मरण पावला नाही.

(৫) মন্দ

সে একজন মন্দ লোক।
तो एक वाईट (किवा आळशी) मनुष्य आहे.

আমার ভাগ্য মন্দ, নচেৎ এরকম হ'ত কেন?
माझे नशीब फुटके, नाहीतर असे कशाला झाले असते ?

কাহাকেও মন্দ বাক্য বলিতে নাই।
कोणालाही अपशब्द बोलू नये.

আজকে আমার শরীর একটু মন্দ বোধ হচ্ছে।
आज मला जरा बरे वाटत नाही.

এইরকম মন্দ কাপড় আমি কিনিব না।
असला वाईट कपडा मी विकत घेणार नाही.

ছেলেটা বড় মন্দবুদ্ধি।
मुलगा अगदी ढ आहे.

সে সকলের সঙ্গে মন্দ ব্যবহার করে।
तो सर्वांशी वाईट रीतीने वागतो.

ঐ লোকটার চালচলন বড় মন্দ।
त्या माणसाची वागणूक फार खराब आहे.

বইটা কেমন লাগল ? মন্দ নয়।
पुस्तक कसे काय वाटले ? खराब नाही. [एकापरीने चागले आहे, (उपहासार्थी) एकदम खराब आहे.]

যদি নিতান্তই মন্দ হয়, আমি তোমার আশ্রয়ে আসিব না।
अगदी वाईटातले वाईट झाले तरी मी तुझ्याकडे आसऱ्याकरिता येणार नाही.

এ ত মন্দ কথা নয়।
ही काही वाईट सूचना नाही.

তখন মন্দ বায়ু বহিতেছিল।
त्यावेळी वारा हळू हळू वहात होता.

বাতাস মন্দ মন্দ বহিতেছে।
वारा हळू हळू वहात आहे.

ক্রিয়া

(১) উঠা

আমি সকালে ৬টায় উঠি।
मी सकाळी सहा वाजता उठतो.

তখন চাঁদ উঠে নাই।
त्यावेळी चंद्र उगवला नव्हता.

খোকার দাঁত উঠিয়াছে।
मुलाला दांत आले आहेत.

তাঁহার চোখ উঠিয়াছে।
त्यांना डोळे आले आहेत.

আমি ঘোড়ায় উঠিতে পারি না।
मी घोडयावर चढू शकत नाही.

রাম অষ্টম শ্রেণীতে উঠিয়াছে।
राम आठवीत गेला आहे.

তোমার মাথার চুল উঠিয়া যাইতেছে।
तुझे केस गळू लागले आहेत.

তাঁহার জ্বর উঠিয়াছে।
त्याचा ताप वाढला आहे.

এবার বেশ চাঁদ উঠেছে।
यावेळी पुष्कळ वर्गणी जमली आहे.

একটু মাটি খুঁড়লেই জল উঠিবে।
जराशी माती खणताच पाणी लागेल

এ কথা বুঝি এখনও তোমার কানে ওঠে নি?
ही गोष्ट अजूनही तुझ्या कानात शिरली नाही वाटते? (समजली नाही वाटते?)

তাহার হটেল কখন উঠিয়া গিয়াছে?
त्याचे हॉटेल केव्हा बंद पडले?

বাজারে আজ অনেক মাছ উঠেছে।
आज बाजारात पुष्कळ मासे आले आहेत.

আমার কথায় সে রাগিয়া উঠিল।
माझ्या बोलण्यावर तो भयकर रागावला.

আমার মন কিছুতেই উঠবে না।
माझे कशानेही समाधान होणार नाही.

কোন কথাই আমার মনে উঠছে না।
कोणतीच गोष्ट मला आठवत नाही.

আপনার কৃপায় আমি এই পদে উঠেছি।
आपल्या कृपेमुळे मी या पदावर पोहचलो आहे.

শাড়ির রং উঠিয়া যাইবে না।
साडीचा रंग विटणार नाही.

এখানকার ভাড়াটেরা বাড়ী ছাড়িয়া কোথায় উঠিয়া গিয়াছে।
इकडचे भाडेकरू घर सोडून कुठे गेले आहेत?

ভারতবর্ষে এখনও পণ প্রথা উঠিয়া যায় নাই।
भारतातून अजूनही हुंड्याची चाल नाहीशी झाली नाही.

ঔষধ বমিতে উঠিয়া গিয়াছে।
औषध ओकारीतून बाहेर पडले आहे.

নতুন কাপড় পেয়ে মেয়েটি নেচে উঠল।
नवीन कपडा मिळाल्यावर (ती) मुलगी फार खुश झाली (शब्दश: नाचू लागली.)

আমি সাত দিনে এই কাজ করিয়া উঠিতে পারিব না।
मी हे काम सात दिवसात करू शकणार नाही.

তোমার মাসিমাকে ট্রেনে উঠাইয়া দাও।
तुझ्या मावशीला आगगाडीत बसव.

বেলুনটি আকাশে অনেক উচুঁ উঠিল।
फुगा अकाशात खूप वरपर्यंत गेला.

একটা বড় ঝড় উঠিয়াছে বলিয়া আজকে স্টীমার যাইবে না।
एक मोठे वादळ झाल्यामुळे आज आगबोट जाणार नाही

উত্তীর্ণ ছাত্রদের তালিকায় তাহার নাম উঠে নাই।
पास झालेल्या मुलांच्या यादीत त्याचे नाव आलेले नाही

ফল বিক্রেতার কলাগুলি সব উঠিয়া গেল।
फळविक्याची सर्व केळी खपली ?

এই একটি নতুন ফ্যাশান উঠেছে।
ही एक नवीन फॅशन प्रचारात आली आहे.

একটা গুজব উঠেছে যে কাল থেকে চিনি পাওয়া যাবে না।
उद्यापासून साखर मिळणार नाही अशी एक अफवा उठली आहे.

(২) কাটা

ঐ গাছটাকে কেটে ফেল।
ते झाड तोडून टाक.

আমি চরকায় সুতা কাটিতে পারি।
मी चरख्यावर सूत कातू शकतो.

এই বইখানি বেশ কাটছে।
या पुस्तकाचा पुष्कळ खप होत आहे.

একটা কুয়া বা পুকুর কাটবার আমার ইচ্ছা আছে।
एक विहीर किंवा तलाव खोदण्याची माझी इच्छा आहे.

এখন বৃষ্টি হইবে না, মেঘ কাটিয়া গিয়াছে।
आता पाऊस पडणार नाही, ढग नाहीसे झाले आहेत.

তুমি সাঁতার কাটতে পার কি?
तुला पोहायला येते काय ?

তৃণজীবী পশুরা জাবর কাটে।
गवत खाणारे पशु रवंथ करतात.

বাবা, সতীশ আমাকে চিমটি কাটছে।
बाबा, सतीश मला चिमटा काढत आहे.

আমাদের বেতন কাটা যাবে কি?
आपला पगार कापण्यात येईल काय ?

আমি ছুরি দিয়া পেন্সিল কাটি।
मी चाकूने पेन्सिल तासतो.

বাক্যের এই অংশটুকু কাটিয়া দাও।
वाक्याचा एवढा भाग काढून टाक.

তাঁহাকে সাপে কেটেছে।
त्याना साप चावला आहे.

তুমি আমার কথা কাটতে পারবে না।
तू माझ्या बोलण्याचे खंडन करू शकणार नाहीस.

তিনি আমার কপালে একটি তিলক কাটিয়া দিলেন।
त्यानी माझ्या कपाळावर एक टिळा लावला.

আমি তোমাকে একখানা পাঁচশ' টাকার চেক কেটে দিব।
मी तुला पाचशे रुपयांचा एक चेक लिहून देईन.

তোমার টেরি কাটবার বয়স এখনও হয় নি।
भांग पाडण्याएवढे तुझे वय अजूनही झालेले नाही

শাড়িখানি পোকায় কেটেছে।
